# श्री साईलीला



" आवो साईबाबा " असे म्हणून फकिराचे स्वागत केले.

जुलै

६० पैसे

१९७५

# अनुक्रमणिका – जुलै १९७५


| | |
|---|---|
| १. प्रिय श्री साईभक्त, सप्रेम नमस्कार | — |
| २. साईभक्तांची श्रद्धास्थाने - फणसवाडीतील साईमंदिर | –श्री. चंद्रकांत सामंत |
| ३. गाठीभेटी - श्री. नागेश आत्माराम सामंत | –सदानंद चंदवणकर |
| ४. भगवान व्यासांचे चिरंजीव कार्य | –जगद्गुरु शंकराचार्य |
| ५. गुरु म्हणजे साक्षात् परमेश्वर | –स्वामी शिवानंद |
| ६. गुरुमाऊलीचे बारा प्रकार | — |
| ७. ओम् साईबाबा | –श्री. वसंत मनोरे |
| ८. शिर्डीतील महत्वाचा उत्सव – गुरुपौर्णिमा | — |
| ९. बाबांची पुण्याई | –कु. संजिवनी मुळे |
| १०. साईबोधामृत | –श्री. द. शं. टिपणीस |
| ११. श्रीसाईनाथ चरित्रमाला | –श्री. र. श्री. पुजारी |
| १२. बायसी | –श्री. विनायक पाठक |
| १३. अलकापुरीचा कुणी देवराणा | –श्री. तु. नाईक |
| १४. मानवी मनाची झलक | –श्री. बा. स. धामणकर |
| १५. साईनिकेतनमधील रामनवमी | — |
| १६. काळ आलाच होता | –सौ. उषाताई मुळे |
| १७. शिरडीवृत्त – एप्रिल व मे १९७५ | |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



# श्री साई वाक्सुधा

साईमाऊली सकळांची ।
विश्रांति आर्त श्रांतांची ।
कल्पवल्ली आश्रितांची ।
दीन दुबळ्यांची जी छाया ॥८२॥
संसारावरी पाणी देऊन ।
गिरी कपाटीं मौन धरून ।
एकांतवास स्वीकारून ।
निज कल्याणैक दक्ष जो ॥८३॥
ऐसे संत असती बहुत ।
केवळ जे साधिती निजस्वार्थ ।
अथवा केवळ निजपरमार्थ ।
काय कीं अर्थ इतरांते ॥८४॥
तेवीं न साईबाबा महंत ।
नसतां आप्तेष्ट गणगोत ।
घरदार वा जायासुत ।
प्रपंचांत राहती ॥८५॥
करतील भिक्षा पांच घरा ।
तरुतलवास अष्टौ प्रहरा ।
मांडूनि थिता प्रपंच-पसारा ।
व्यवहार सारा शिकविती ॥८६॥

श्रीसाईसच्चरित् अध्याय १७ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५४ वे ] जुलै १९७५ [ अंक ४

: संपादक :
श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी

: कार्यकारी संपादक :
- डॉ. श्री. दि. परचुरे,
- श्री. सदानंद चेंदवणकर

वार्षिक वर्गणी रु. ६-०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक रु. ०-६० फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४३३६१

# प्रिय वाचक--सप्रेम नमस्कार—

शिरडी येथे दरवर्षी पुण्यतिथ्योत्सव व श्रीरामनवमी उत्सव, श्रीसाईबाबांच्या प्रेरणेने मोठ्या समारोहाने व भक्तिभावपूर्वक साजरे केले जातात, त्याच-प्रमाणे त्या खालोखाल महत्त्व श्रीगुरुपौर्णिमेनिमित्त होणाऱ्या उत्सवाला आहे आणि तो उत्सवप्रसंग या महिन्यात येत आहे.

गुरुमहात्म्य आम्ही काय सांगणार? गुरु म्हणजे प्रति परमेश्वर. त्याचा महिमा ज्यांना त्याची ओळख पटली त्यांनीच गावा. 'हे तो अनुभवाचे बोल!' आणि आजवर अनुभवी साधुसंतांनी गुरुमाऊलीचे महात्म्य परोपरींने गायिले आहे. तेच त्यांच्या शब्दात सांगण्याचा, अल्प प्रमाणात का होईना, आमच्या वाचकांसाठी गुरुमहिमा कथन करण्याचा, हा ल्हानसा प्रयत्न आहे; आमचे वाचक तो गोड मानून घेतील अशी आशा आहे.

× × ×

श्रीसाईबाबा हे गुरु महाराजांचे महत्व जाणून होते. गुरुमाऊलीवर त्यांची असीम निष्ठा होती असे दिसून येते. आणि म्हणूनच तर त्यांच्या प्रेरणेनेच शिरडीत प्रतिवर्षी गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या समारोहाने साजरा केला जात असतो; परंतु श्रीसाईभक्तांनी नेहमी लक्षात बाळगण्याजोगी एक महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी आपले शिष्य असे कोणी केले नाहीत व कोणाच्या कानात गुरुमंत्रहि सांगितला नाही.

गुरुचा महिमा व गुरुचा गौरव किती आहे हे जाणत असूनहि ते बहु-मानाचे लेणे लौकिकदृष्ट्या ते जरी ल्याले नाहीत तरी त्यांचे सारे जीवन गुरुमय बनलेले होते. नावात काय आहे? सारे काही आहे ते कृतीत. त्यांच्या, साऱ्या जीवनातील साऱ्या घटना गुरुकृपेने भारलेल्या होत्या. श्रीसाईबाबा, गुरु, शिष्य व त्यांचे जीवनकार्य ही सारी नाती त्यांच्या जीवनात एकमेकाशी इतकी निगडित झालेली होती की, त्यांची एकमेकापासून फारकत करता येण्याजोगी नव्हती.

× × ×

'जगाच्या कल्याणा । संतांच्या विभूति ।' अशा कोटीतील ते होते त्यांनी गुरुशिष्य सांप्रदायाचा व्याप केला नाही; परंतु सर्वांनी सुखांत, समा-धानात व आनंदात नांदावे यासाठी ते परोपरीने झटले. श्रीसाईबाबा म्हणजे माणुसकीचा पूर्णावतार. मानवाचे दुःख, दैन्य दूर करावे, मानवातील दानव नाहीसा करावा, मानव चिंतामुक्त व रोगमुक्त व्हावा, यासाठी ते परोपरीने

झटले व त्यांनी अभिवचन देऊन ठेवल्याप्रमाणे आजही त्यांच्यामागे ते कार्य तितक्याच किंबहुना अधिकाधिक जोमाने अखंड चालू आहे.

× × ×

श्रीसाईबाबांच्या कार्याचा यशोध्वज त्यांच्या हयातीत ज्या ऐश्वर्याने व वैभवाने फडकत होता, त्याच वैभवाने व दिमाखाने तो त्यांच्यामागे आजही डौलाने फडकत आहे. शिरडी म्हणजे साईभक्तांची पुण्यपावन गंगोत्री. ठायी ठायी कितीही साईधामे निर्माण झाली तरी त्या गंगोत्रीचे महत्व व महात्म्य कधीही तिळभर कमी होणार नाही. उलट ते उत्तरोत्तर वाढतच जावयाचे आहे व तसे ते वाढत चालले आहे.

हे स्थानमहात्म्य, त्याची असंख्य भक्तांच्या मनाला लागून राहिलेली अखंड ओढ व साईबाबांच्या ठायी वाढत चाललेली जनतेची भक्ति ध्यानी आणून तिच्यापासून येनकेन प्रकारेण फायदा करून घेण्याचे प्रयत्न मधूनमधून चालू असतात. 'साई दरबार,' 'द्वारकामाई' यासारखी जनतेची मने आकृष्ट करणारी व भोळ्या मनाला भुरळ पाडणारी शब्दयोजना करून स्वार्थासाठी जो आभास निर्माण केला जात असतो, त्यापासून जनतेने नेहमी सावध राहिले पाहिजे.

कोणी काय वाटेल ते करो; कोणत्या गोष्टींचे आचरण करण्यात साई-बाबांची भक्ति केल्याचे पुण्य पदरी पडते याचा विचारी भक्तांनी स्वतःशी विचार व त्याप्रमाणे आचार केला पाहिजे. ज्या प्रयत्नांच्या पायाशी स्वार्थ पुजला गेला आहे, तो प्रयत्न कधीहि सफल होणार नाही, आजवर सफल झालेला नाही.

साईबाबा ही आपले मनोरथ पूर्ण करणारी विभूति आहे. त्यांना मनो-भावे जो शरण गेला, त्याला त्या शरणागतीचे सुंदर फळ चाखायला मिळा-ल्याशिवाय रहाणार नाही. परंतु त्यासाठी वाटाड्याची मात्र जरूरी नाही. येथे प्रत्येकाने मनोमन साक्ष पटवून घ्यायची आहे. जे काही करायचे ते मनाला ग्वाही ठेऊन करावयाचे. येथे मध्यस्थाची किंवा वाटाड्याची जरूरी नाही.

साईलीलेतून हे वेळोवेळी आम्हाला परोपरीने सांगावे लागत आहे; कारण आजकाल जिकडे पहावे तिकडे भोळ्या भाविकास फसविण्याचे प्रयत्न फार चाललेले आहेत. स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी कल्पक लोक नाना प्रका-रच्या युक्त्या लढवीत आहेत व बहुसंख्य भक्तांच्या मनाला भुरळ पाडणाऱ्या साईबाबांच्या नावाचा संबंध जोडून देत आहेत. अशा वेळी भक्तांना सावध-गिरीची सूचना देणे, हे आमचे कर्तव्य आहे. ● ●

# श्रीसाईबाबा पादुकास्थान–फणसवाडी

लेखक :– श्री. चंद्रकांत दामोदर सामंत



"श्रीसाईसच्चरिता"च्या चौथ्या अध्यायात 'श्रीक्षेत्र पंढरपूर व श्री विठ्ठल-रखुमाईचा वारंवार उल्लेख आहे. "पंढरीत विठ्ठलरखुमाई । यांच्या दर्शनी जी नवलाई । तेंचि विठ्ठल दर्शन देई । बाबासाई शिरडीत" अशी ग्वाही कै. आण्णासाहेब दाभोळकर उर्फ 'हेमाडपंत' ह्यांनी ह्या अध्यायाच्या ७३ व्या ओवीत दिली आहे. एवढेच नव्हे, तर खुद्द श्रीबाबांनी त्याच अध्यायाच्या ८५ व्या ओवीत संतश्रेष्ठ दासगणु महाराजांना उद्देशून पुढील उद्‌गार काढले आहेत, "डाकुरनाथाची डंकपुरी । अथवा विठ्ठलरायाची पंढरी । तीहीच रणछोड द्वारकानगरी । जाणें न दूरी पहावया ।". श्रीविठ्ठलपूजनी श्रीसाईबाबांना किती आदर होता हे त्यांनी श्री भगवंतराव क्षीरसागर ह्या

भक्ताला दिलेल्या प्रचीतिवरुन दिसून येते. ह्या भक्ताचे वडील श्रीविठ्ठल-भक्त होते. त्यांच्या पश्चात् श्रीविठ्ठलाची पूजा-अर्चा, नैवेद्य इत्यादी उपचार बंद पडले. त्या गोष्टीचा उल्लेख श्री. भगवंतरावांसमोर करुन श्रीसाईबाबांनी आपले श्रीविठ्ठलस्वरुप दर्शविले.

श्रीसाईनाथांच्या श्रीविठ्ठलस्वरुपाचे द्योतक असे एक मंदिर मुंबईच्या फणसवाडी विभागात आहे. कोळ्याची वाडी ह्या नावाने प्रसिद्ध असलेल्या वस्तीला लागूनच हे "श्रीसाईबाबा पादुकास्थान" आहे. सुमारे ९ वर्षापूर्वी श्रीसाईबाबांच्या मूर्तिची स्थापना होईपर्यंत हे मंदिर "श्रीप्रेमळ विठ्ठल मंदिर" ह्याच नावाने ओळखले जात असे. श्री गजानन विनायक प्रधान यांनी स्वत: साठी बांधलेल्या ह्या खाजगी देवळाचा कायाकल्प घडवून आणला ह. भ. प. श्री वसंतशास्त्री उर्फ आबा पणशीकरांनी. श्री पणशीकर हे मराठी रंग-भूमीवरील सुप्रसिद्ध नट श्री प्रभाकर पणशीकर ह्यांचे बंधू. त्यांची कीर्तने नित्यनियमाने ह्या मंदिरात होत असत. त्यांना श्रीसाईबाबांच्या उपासनेची दीक्षा दिली मुगभाटातील एक साईभक्त श्री भोळे गुरुजींनी. त्यापूर्वी त्यांना श्रीसाईबाबा हे नावसुद्धा अपरिचित होते. पण त्यानंतर त्यांची श्रीसाईपदी जी निष्ठा, जडली ती कायमचीच. मुख्यत्वे त्यांच्याच परिश्रमामुळे "श्री प्रेमळ विठ्ठल मंदिराचे" "श्रीसाईबाबा पादुकास्थानात" रुपांतर घडुन आले.

सदर मंदिराचे रचनेच्या दृष्टीने दोन भाग पडतात. पुढील म्हणजे दर्शनी भागाचा आकार सर्वसाधारणपणे एखाद्या देऊळाच्या गाभाऱ्या सारखा असून तेथेच श्रीबाबांची प्लास्टरची सुमारे साडेचार फूट उंचीची शिळेवर बसलेली मुर्ति आहे. ह्या मुर्तिचे एक वैशिष्टय म्हणजे सोबतच्या छायाचित्रात दर्शविल्याप्रमाणे श्री बाबांची नजर किंचित खाली झुकलेली आहे. ह्या मूर्तिच्या पाठीमागे श्रीविठ्ठलरखुमाई ह्यांच्या छोटया मूर्ति आहेत. ह्या गाभा-ऱ्यात प्रवेश करण्यास व श्रीबाबांना फुले, हार अर्पण करण्यास सर्वांना मुभा आहे. सदरमुर्ति श्री. जी. व्ही. पाटकर ह्या मूर्तिकारांनी घडविली आहे.

मंदिराच्या पाठीमागच्या जागेत मध्यभागी जवळजवळ शंभर वर्षापूर्वी-चा एक जुना पिंपळवृक्ष असून आजूबाजूला श्रीदत्तात्रेयाची मुर्ति, श्रीमहा-देवाची पिंडी व श्रीहनुमानाचा एक छोटासा पुतळा आहे. त्या व्यतिरिक्त श्रीसाईबाबांच्या चांदीच्या पादुका ह्या भागात असून त्यांची स्थापना दिनांक २६ ऑक्टोबर १९५२ रोजी श्री पालेकरशास्त्री यांच्या हस्ते झाली.

श्रीसाईबाबांच्या चांदीच्या पादुका तयार करवून घेऊन त्या श्रीबाबांच्या सेवेला वाहून घेतलेल्या व्यक्ति वा संस्था ह्यांना अर्पण करण्याचा उपक्रम ह्या मंदिरातर्फे चालविला जातो. आतापर्यंत पाच ठिकाणी ह्या पादुकांची

स्थापना झाली आहे. त्यापैकी एक उल्लेखनीय स्थान म्हणजे लंडन येथील श्रीमती आजीबाई बनारसे ह्यांचे श्रीसाईमंदिर हे होय.

वरील धार्मिक कार्याला सामाजिक कर्तव्याची जोड देऊन ह्या मंदिराने आपले एक आगळे स्थान निर्माण केले आहे. मंदिराच्या वरच्या मजल्यावर गरीब व होतकरू शाळकरी विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय असून ह्या विद्यार्थ्यांकडून श्रीसाईनाथांच्या सेवेचे पुण्यकर्म नित्य घडत असते.

सदर मंदिरात शिरडी येथील मंदिराप्रमाणे दैनंदिन कार्यक्रम आयोजिले जातात. रामनवमी, गुरुपौर्णिमा व विजयादशमी ह्या सणांशिवाय श्रावण महिन्यातील एका सोमवारी तसेच महाशिवरात्री ह्या दिवशी श्रीबाबांच्या मूर्तिसमोर फळांची मोठ्या प्रमाणावर पुजा केली जाते. ह्या फळांचा प्रसाद भक्तमंडळींना वाटला जातो.

ह्या मंदिराची दैनंदिन व्यवस्था मोठ्या आस्थेने पाहणारे एक तरुण कार्यकर्ते श्री पांडुरंग महादेव वारंग ह्यांच्या श्रीसाईनिष्ठेला तोड नाही. सध्या त्यांचे वय अवघे एकतीस वर्षांचे असून गेली बावीस वर्षे त्यांचे ह्या जागेत वास्तव्य आहे. अपुऱ्या जागेमुळे सदर मंदिराचा विस्तार करता येत नाही. ह्या गोष्टीची त्यांना रुखरुख वाटते. "आमच्या मार्गात येणाऱ्या अडचणींचे निराकरण श्रीबाबांच्या कृपेने आपोआप होत असते" ह्या श्री. वारंग ह्यांच्या उद्‌गारांवरूनच त्यांच्या श्रीसाईनाथांच्यावरील निष्ठेची कल्पना येते.

● ●

**श्री साईलीला ऑगस्ट अंकात —**

पुण्यातील स्वारगेटच्या श्री साईमंदिराचा सचित्र परिचय अवश्य वाचा.


लेखक — **चंद्रकांत सामंत**

# श्रीसाईलीलेचे सुरूवातीचे संपादक--

# श्री. नागेशराव सावंत

● श्री. सदानंद चेंदवणकर

श्रीसाईलीला मासिकाचे सुरुवातीचे संपादक श्री. नागेशराव आत्माराम सावंत यांचा ऐंशीवा वाढदिवस या महिन्यात साजरा होत आहे याबद्दल आम्ही



त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. आज श्री. सामंत यांचे प्रकृती स्वास्थ्य काहीसे बिघडलेले असले तरी बिछान्यावर बसल्या बसल्या ते श्रीबाबांच्याबद्दल अनेक आठवणी सांगतात. सध्या त्यांचे वास्तव्य शिर्डी येथे असून आपल्या या आजारपणात एका सत्पुरुषाने आपणास या ठिकाणी येऊन रहाण्यास सांगितलेले आहे असे ते सांगतात. श्रीसाईबाबा संस्थानचे ग्रंथपाल व समाधिमंदिर प्रमुख श्री. बागवे यांचे श्री. नागेशराव सख्खे मामा होत.

श्री. नागेशरावांचा जन्म २ जुलै १८९५ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील पेंडुर या गावी झाला. त्यांचे वडील आत्मारामपंत हे शेती करीत. नागेशरावांच्या मातोश्रींचे नाव कृष्णाबाई. त्यांना एक पुत्र व एक कन्या अशी दोनच अपत्ये झाली. त्यापैकी पुत्र श्री. नागेशराव हेच काय ते हयात आहेत, कन्या म्हणजे नागेशरावांच्या भगिनी शांताबाई या दळवी घराण्यात विवाहित झाल्या व सुमारे १४ वर्षापूर्वी निवर्तल्या.

नागेशरावांचे प्राथमिक शिक्षण पेंडुर व दुय्यम शिक्षण मुंबईला झाले. दादर इंग्लीश स्कूलचे ते विद्यार्थी पण मॅट्रिकच्या आसपास आल्यावर त्यांनी आपल्या शिक्षणाला कायमचा रामराम ठोकला व दादरच्या कोहिनूर मिल मध्ये कारकून म्हणून नोकरी पत्करली. पुढे त्यांनी पोलीस खात्यात शिरकाव करून घ्यायचे ठरविले व त्याप्रमाणे ते नाशिकच्या पोलिस ट्रेनिंग कॉलेजात १९१७ त भरती झाले. येथपावेतो त्यांना श्रीसाईबाबांचे नावही माहीत नव्हते.

नाशिकला पोलिशी शिक्षण घेत असताना त्यांचा एक मित्र होता, त्यांचे आडनाव देव. एके दिवशी त्याच्या खोलीत त्यांना एका साधुपुरुषाचा फोटो आढळला. कुणाचा म्हणून विचारता तो साईबाबांचा आहे असे त्यांना उत्तर मिळाले. "देव महाराज हा फोटो मी घेऊ का?" म्हणून तरुण नागेशरावांनी विचारणा केली तेव्हा आपणापाशी तो एकच एक फोटो आहे म्हणून नको असे उत्तर त्यांना मिळाले; पण लगेच दोन चार दिवसात एक चमत्कार घडला. देव आपल्या जवळचे एक पुस्तक वाचीत होते आणि कसे काय कुणास ठाऊक त्यांना त्या पुस्तकात श्रीसाईबाबांचा एक फोटो आढळला व मग तो देवांनी नागेशरावांना ताबडतोब आणून दिला. हा फोटो मिळाल्यापासून मात्र नागेशराव श्रीसाईभक्त झाले ते अगदी आजतागायत. १९१७ साली आपल्या मित्राने दिलेला तो फोटो आजही नागेशरावांजवळ आहे, व या फोटोचीच ते भक्ति करीत असतात.

१९१७ साली नागेशराव पोलीस खात्यात हवालदार म्हणून नोकरीस लागले व १९५० साली सेवानिवृत्त झाले. लगेच त्यांना बर्माशिलमध्ये सिक्युरिटी ऑफिसर म्हणून नोकरी चालून आली होती पण बाबांच्या समोर त्यांनी स्वीकारु की नको म्हणून चिठ्ठ्या टाकल्या व बाबांनी नको म्हटले म्हणून ती त्यांनी अव्हेरिली. श्रीसाईबाबांचा फोटो मिळाल्यापासून त्यांची बाबांच्यावरील भक्ति सारखी वाढत चालली. आपल्या जीवनातून श्रीबाबांची भक्ति-सेवा जर काढून टाकली तर आपले जीवन शून्यवत् आहे असे त्यांना वाटू लागले. एकदा तर त्यांच्या मस्तकावर एक पाल पडली. सर्वांनी त्यांचा मृत्युयोग जवळ आला म्हणून सांगितले पण नागेशरावांनी श्री बाबांचे सातत्याने नामस्मरण करून हा मृत्युयोग टाळला ! बाबांच्या संबंधीच्या अशा एक ना दोन कितीतरी आठवणी श्री. नागेशरावांजवळ आहेत.

श्री. नागेशरावांचा १९२४ साली श्रीसाईबाबा संस्थानशी संबंध आला. १९३९ ते ४० पर्यंत ते एक साधे सभासद होते. १९४४ पासून ते विश्वस्त होते. आजही त्यांनी त्यावेळी स्थापन केलेला हा ट्रस्ट चॅरिटी कमिशनरकडे श्री. नागेशराव सावंत यांच्या नावानेच आहे. श्री. सावंत यांच्या कारकिर्दीतच संस्थानचे भोजनगृह, सभामंडप, ड्रेनेज, संडास, वीजघर, समाधिमंदिरावरील कळस, मूर्ति इ. ची व्यवस्था झालेली आहे व या गोष्टी करताना स्वतः नागेशराव हजर रहात असत.

श्री. नागेशरावांचा विवाह त्यांच्या वयाच्या विसाव्या वर्षी झाला. त्यांच्या पत्नी सौ. इंदिराबाईना तीन पुत्र व एक कन्या अशी अपत्यसंपदा आहे. नागेश-

रावांचे थोरले चिरंजीव श्री मनोहरपंत नागपूरास एस. टी. चे डिव्हिजनल कंट्रोलर असून मधले नरेंद्र कुर्ल्याच्या प्रिमियर ऑटोमोबाईल्समध्ये इंजिनियरिंग खात्यात आहेत. धाकटे श्री चंद्रकांत सध्या आफ्रिकेत असतात. कन्या कुमारी शशिकला आता सौ. वर्षाली विजय सावंत या नावाने ओळखल्या जातात. त्यांचे जावई ऑर्थर रोडला तुरुंग अधिकारी आहेत. स्वतः नागेशराव तर परम साईभक्त आहेत पण मोठ्या भाग्याची गोष्ट ही की त्यांचे तिन्ही पुत्र व कन्या आणि जावई पण श्रीसाईभक्त आहेत. आजही या वयात श्री नागेशराव आपल्याकडून जेवढी करता येईल तेवढी साईभक्ति करतात. श्रीसाईबाबांच्या येथल्या सहवासात आपल्या प्रकृतीला निश्चित उतार पडेल अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे. ●●●

## श्रीसाईनाथ रोजनिशी [१९७५-७६]

दरवर्षाप्रमाणे श्रीसाईनाथ रोजनिशी प्रकाशित करण्यात आली असून ती श्रीसाईबाबा संस्थान आजीव-सदस्यांना रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पाठविण्यात आली आहे. इतराना ही संग्राह्य व पुढील गुढीपाडव्या पर्यंतची रोजनिशी दादर व शिर्डीच्या कचेरीत अवघ्या पाच रुपयात मिळू शकेल. प्रति आता अगदी मोजक्याच असल्याने श्रीसाईभक्तांनी त्वरा करावी.

## श्रीसाईबाबा ब्रोचर आणि फोल्डर

संतचूडामणि भगवान श्रीसाईबाबा आणि शिर्डीतील प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन या संबंधीच्या माहितीने खच्चून भरलेले असे पंचरंगी डी-लक्स कागदावर छापलेले ब्रोचर नुकतेच श्रीसाईबाबा संस्थान तर्फे प्रकाशित करण्यात आले आहे. ही संग्राह्य व अगदी शोकेसमध्ये ठेवण्यालायक ब्रोचर्स व फोल्डर्स मराठी व इंग्रजीत छापण्यात आली असून संस्थेच्या दादर व शिर्डी कचेरीत अवघ्या पन्नास पैशास मिळू शकतील. फोल्डरमध्ये शिरडीतील प्रेक्षणीय स्थळांची दहा पंचरंगी चित्रे असून मुखपृष्ठावर बाबांचे मोहक चित्र आहे.

# भगवान व्यासांचे चिरंजीव कार्य

**भगवान व्यासांचे पुण्यस्मरण घडविणारी गुरुपौर्णिमा या महिन्यात येते. व्यासानी महाभारत, व ब्रह्मसूत्रे आदि ग्रंथांच्या रूपाने भारतवासीयांवर केवढी कृपा करून ठेवली आहे, त्याची कल्पना पुढील लेखावरून थोडीशी होईल.**

आमच्या प्राचीन धर्माचा पाया वेद हाच होय, त्या भरभक्कम व खंबीर पायावर आपल्या सनातन धर्माचे सुंदर मंदिर उभारण्यात आलेले आहे. म्हणजे प्रत्यक्ष भगवंताचा श्वास होय! असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. मनूने स्मृतीत नमूद करून ठेविले आहे की, वेद हेच धर्माचे मुख्याधार आहेत. वेदोखिलो धर्ममूलं कलियुगापूर्वीच्या युगातील लोक दीर्घजीवि तसेच फार बुद्धिमान् होते. कलियुगातील लोकांचे आयुष्य फार तोकडे, त्याच प्रमाणे त्यांची बुद्धीही तोकडी. तसेच त्यांच्यामागे सुखापेक्षा दुःखेच जास्त हात धुवून लागलेली असणार. तंटे भांडणात त्यांचा वेळ निघून जाणार, मग वेदाध्ययन करायला त्यांना वेळ कुठून मिळणार!

आणि वेद तर जिवंत राहिले पाहिजेत. त्यांचा अभ्यास झाला पाहिजे. नाहीपेक्षा ते जगातून नाहीसे होतील. त्यामुळे धर्मावर घाला येईल. धर्माचा पायाच ढासळला मग काय शिल्लक रहाणार? भगवंताच्या लक्षांत ही गोष्ट आल्याशिवाय कशी राहील? वेदांचे रक्षण म्हणजे धर्माचे रक्षण! आणि ते तर झालेच पाहिजे. देवाला त्या गोष्टीची चिंता, आणि म्हणूनच द्वापार युगाच्या अखेरीस भगवंतांनी पाराशर ऋषींच्या घरी जन्म घेतला. पाराशर व त्यांची पत्नी सत्यवती यांचे भाग्य फार मोठे. त्यामुळे व्यासाच्या रूपाने भगवान त्यांच्या घरी अवतीर्ण झाले.

व्यासांची कामगिरी फार मोठी आहे. सारेच वेद सर्वांकडून शिकले जाणार नाहीत या जाणीवेने त्यांनी वेदांची चार भागात वाटणी केली, व आपल्या चार शिष्यांना त्यांचा योग्य तो परिचय करून दिला. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या नावाने ते चार भाग ओळखले जातात.

सगळे वेद समजून घेता आले नाहीत तरी त्यापैकी एखाद्या वेदाचा काही भाग तरी समजून घेण्यात यावा. व्यास महर्षींनी हा उपदेश मोठ्या कळकळीने केला आहे व त्यात त्यांचा उद्देश वेदांचे जतन झाले पाहिजे हाच आहे. वेद जिवंत रहावे अर्थात् धर्म जिवंत रहावा, त्याचा लोप होऊ नये यासाठीच त्यांनी हा उपदेश केलेला आहे. त्या उपदेशाचे रहस्य आपण समजून घेतले पाहिजे.

तैतरेय उपनिषद हा यजुर्वेदाचा एक भाग आहे. त्यात गुरुने शिष्याला एक महत्वाची आज्ञा केली. शिष्याने जगात कसे वागावे हे गुरुने अगदी सूत्ररूपाने सांगितले आहे. गुरुने शिष्याला सर्व प्रथम काय सांगितले ? '**सत्यं वद**' 'धर्मं चर.'

किती महत्त्वाचा उपदेश हा ! परंतु त्या उपदेशाचे लोककल्याणासाठी व बहुजन समाजाला समजण्यासाठी खुलासेवार विवरण होणे आवश्यक आहे. एरवी जनतेला ते समजावे कसे ? आणि म्हणूनच पुराणाच्यां व महाभारतासारख्या महाकाव्याच्या रूपाने ती शिकवण देणे जरूर होते.

आणि याच उद्देशाने सत्य व धर्म ही जी जीवनातील दोन महान तत्त्वे ज्याना जीवनाधार म्हणता येईल, ती जनतेत पसरावी, जनतेला त्यांचे महत्त्व समजावे व जनतेने ती आत्मसात करावी यासाठी भगवान् व्यासांनी महाभारत रचिले. मनुष्यांने ऐहिक व पारलौकिक हित कसे व कोणत्या मार्गाचा अवलंब करून साधावे व इह-परलोकी कसे वागावे याचे जरूर ते ज्ञान त्या महान् ग्रंथाच्या रूपाने देण्यात आले आहे. महाभारत हा जीवनास जरूर ती प्रेरणा देणारा महाग्रंथ आहे. म्हणूनच त्याला पांचवा वेद असेहि म्हणतात.

भारताला हा ग्रंथ देऊन भारतवासीयांस व्यासांनी कायमचे ऋणी करून ठेविले आहे. ते ऋण कधीहि व कोणत्याही मार्गांनी फिटण्यासारखे नाही.

किती सुन्दर रीतीने पुढील श्लोकात या ऋणाचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

**नमो ऽ स्तु ते व्यास विशाल बुद्धे**<br>**फुल्लार विंदाय तपत्र नेत्र ।**<br>**एनत्वया भारत तैल पूर्णः**<br>**प्रज्वालितो ज्ञानमय प्रदीपः**

महाभारत म्हणजे ज्ञानाचे भांडार आहे. भांडारात किती तरी दैदिप्यमान रत्ने आहेत, आणि त्या रत्नातील कोहिनूर म्हणजे भगवद्‌गीता होय. या गीतेच्या द्वारे व्यासानी जीवन सफल करण्याचा गुरुमंत्र आम्हाला देऊन ठेविला आहे. आम्ही आध्यात्मिकतेचे शिखर कसे गाठावे, या व परलोकात सर्वश्रेष्ट स्थान आम्ही कसे प्राप्त करून घ्यावे, हे त्यांनी सांगितले आहे.

आम्ही आमच्या वाटयास आलेली सारी कर्मे निष्काम वृत्तीने व समर्पण बुद्धीने आचरावी. फळाचा विचारच मनात आणू नये. आमचे मन आम्ही नेहमी पवित्र ठेवावे. त्याला कसलाही मळ लागू देऊ नये. मनाचे पावित्र्य सांभाळण्यात आले म्हणजे ज्ञान प्राप्तीचा मार्ग सुलभ होत जाईल.

निष्काम वृत्तीने कर्माचरण करीत असेच आमच्याकडून भक्तिमार्गाचेही

आचरण व्हावे. या मार्गाला उद्देशून सांगितले आहे की, 'मन्मना भव मद्भक्तो', मद्याजी माम् नमस्कुरु' तुझे मन नेहमी माझ्याठायी लागून राहूं दे. माझी भक्ति कर. सतत माझे ध्यान कर, मला नमस्कार कर, अशा रीतीनें भक्ति-भावाची महती व्यासानी वर्णन केली आहे. आम्ही देवाची भक्ति कशी करावी व त्याला प्राप्त करून घ्यावे हेच व्यासानी त्या श्लोकाच्या रूपाने सांगितले आहे.

कलियुगात माणूस नाना प्रकारच्या मायाजाळात गुरफटून गेलेला आहे. त्याची चोहोकडून ओढाताण होत आहे. त्याला मग देवाची प्राप्ति व्हावी कशी? ती भक्ति मार्गानेच होण्याची शक्यता आहे. तो मार्ग कसा चोखाळावा याचे व्यासांनी फार चांगले व सुबोध मार्गदर्शन केले आहे. श्रीमत् भागव-ताच्या द्वारे हा भक्तिमार्ग आपणास सुलभतेने समजु शकतो.

स्वधर्माच्या द्वारे आम्हीं आमचे मन शुद्ध करावयाचे आहे. 'स्वधर्म' या शब्दात अर्थ भरलेला आहे. आपण ज्या परिस्थितीत जन्म घेतला त्या परि-स्थितीला अनुसरून आपल्या वाटचाला जे कर्तव्य आले असेल तोच आपला धर्म. त्या धर्माचे पालन इमानेइतबारे करावयाचे, त्यात कुचराई व लबाडी बिलकूल करावयाची नाही, आणि मग तुमचे शुद्ध मन ईश्वर भक्तिकडे आपो-आप वळेल.

ब्रम्हसूत्रांच्या रूपाने व्यास महर्षींनी आमच्या साऱ्या शंकांचे निरसन केले आहे. त्यांत त्यानी उपनिषदांचे सारसर्वस्व आणिले आहे. व्यासानी आम-च्यावर किती उपकार करून ठेविले आहेत! केवढें ज्ञानभांडार त्यांनी आम-च्यापुढे उघडून ठेविले आहे! त्यांचे वर्णन शब्दांनी करता येणे कोणालाही शक्य नाही. महाभारत (भगवद्गीतेसह) भागवत व ब्राह्मसूत्रेहि दिव्य व सर्व काळी आमचे तारण करणारी रत्ने त्यांनी आम्हाला देऊन ठेविली आहेत.

माणूस कोणत्याहि वृत्तीचा असो. त्याचा व्यवसाय कोणताहि असो. त्याने आपल्या जरूरीप्रमाणे या ज्ञानभांडाराचा उपयोग करून घ्यावा व आपले जीवन सफल करावे. भगवान व्यासासारखा मार्गदर्शक व अचूक वाटाड्या आणखी दुसऱ्या कोणत्या देशाच्या वाटचाला आला असेल असे वाटत नाही. आम्हा भारतवासीयांचे केवढे हे भाग्य! भगवान् व्यासासारखा महान् वाटाड्या आम्हाला लाभावा ही भगवंताची या देशावर खास कृपाच समजली पाहिजे. त्यांनी आम्ही असत्याकडून सत्याकडे कसे जावे, अंधकारातून प्रकाशाकडे कसे जावे, व मृत्यूपासून मुक्तता करून घेऊन अमरत्वाप्रत कसे जावे, याचा सुंदर मार्ग आम्हाला दाखवून दिला आहे.

भगवान व्यासाना आमचे शतशः प्रणाम !

● ● ●

# गुरू म्हणजे साक्षात् परमेश्वर!

[स्वामी शिवानंद]

देव आणि मानव यांची जोड घडवून आणणारा दुवा म्हणजे गुरु होय. आपल्या गुरुजीना मनोभावे शरण जा. त्यांची आज्ञा शिरसावंद्य माना. त्यांची मनोभावे सेवा करा. त्यांना सर्वस्व मानून त्यांच्यावर जीवेभावे प्रेम करा; त्यामुळे तुमचे अंतःकरण हां हां म्हणता पवित्र बनेल. जेथे लक्ष लागणे जरूर, तेथे तुमचे लक्ष केंद्रीभूत होईल. गुरुच्या कृपेमुळे तुम्हाला स्वस्वरुपाची ओळख लवकर पटेल.

गुरु म्हणजे प्रती परब्रम्ह. गुरूच्या सहाय्याशिवाय व मार्गदर्शनाशिवाय साधना किंवा आत्मप्रचीति शक्य होणार नाही.

या भूतलावरील भगवंताचा प्रतिनिधी म्हणजे गुरूच होय. साधक व ब्रम्ह् यामधील मध्यस्थ म्हणजे गुरूच होय.

देव व गुरूदेव या दोघात भेदभाव पाडण्यात येऊ नये. ज्याची गुरूवर अढळ निष्ठा आहे तोच अविनाशी ब्रम्हाची प्राप्ति करून घेऊ शकतो व संसार सागरातून पलिकडे जाऊ शकतो. गुरु काय करतो? तो साधकांचे अज्ञानपटल दूर करून त्याला ज्ञानचक्षूची प्राप्ति करून देतो.

तुम्हाला अमरत्वाकडे घेऊन जाणाऱ्या व शाश्वत सुखाचा राजमार्ग दाखविणाऱ्या गुरूला निष्ठापूर्वक चिकटून रहा.

गुरू तुम्हाला मार्ग दाखवील; परंतु बाकी सर्व सांगितल्याप्रमाणे शिष्यानें पार पाडावयाचें असते.

गुरूजवळून मार्ग समजाऊन घ्या, आणि त्याच्या शब्दावर श्रद्धा ठेऊन त्या मार्गाने जा व इतरानाही आपल्या बरोबर घेऊन जा.

गुरू म्हणजे प्रती ईश्वर. गुरु म्हणजे तुमची माता, तुमचा पिता, मित्र, मार्गदर्शक आणि सगासोयरा. त्याच्यावर संपूर्ण व अंतःकरणपूर्वक श्रद्धा ठेवा. सर्व प्रकारच्या संशयाना व भीतीला फाटा द्या. तीच तुमची साधना व तीच तुमचे हेतु पूर्ण करील.

एक गोष्ट नेहमी लक्षात बाळगा. गुरूशी मानसन्मानपूर्वक वागणें व त्यांचा प्रत्येक शब्द उचलून धरणे, हेच तुमचे कर्तव्य. त्याची कृपा संपादन करण्यात तुम्ही यश मिळविले पाहिजे. साधकाने आपल्या अध्यात्मकार्यात यश मिळविण्याचा हाच मार्ग आहे.

आत्मानुभव शक्य तेवढ्या लवकर घडावा असे ज्या शिष्याला वाटते, त्याने गुरुचा शोध लागल्यानंतर काही गुणांचा आसरा अवश्य घेतला पाहिजे. त्याला गुरुची कृपा संपादन करता आली पाहिजे.

स्वतःची तयारी परिपूर्ण व्हावी लागते. ती जर झालेली असेल तर तुम्हाला सद्गुरूच्या सहाय्याने आत्मानुभव यायला फारसा विलंब लागणार नाही.

मला देवाचे दर्शन झाले पाहिजे, याबद्दल तुम्हाला अपरंपार तहान व उत्कंठा लागून राहिली पाहिजे. अध्यात्मिक भूक वरवरची नको. अंतःकरणापासून पाहिजे.

भगवंताची ओळख व्हावी ही तुमची आकांक्षा आहे का? मग त्यागाची कास धरा. त्याग करायला शिका.

तुमचे अंतःकरण निर्लेप व निर्मळ बनु द्या. मग त्या जागी आपण बैठक मारावी असे भगवंताला वाटू लागते. सारी सूत्रे त्या दिशेने हालू चालू लागतात.

सबुरीने घ्या. अधीर होऊ नका. प्रत्येक गोष्ट धीराने घ्या. अंतःकरणात तळमळ निर्माण होऊ द्या. मन एकाग्र होऊ द्या. चिकाटी सोडू नका चिकाटीने त्या उद्योगात मग्न व्हा. आणि मग यश निश्चित मिळाल्याशिवाय रहाणार नाही. याची खात्री बाळगा.

● ●

# नांदा सौख्यभरे

● श्रीसाईबाबा संस्थानचे कोर्ट रिसिव्हर श्री. का. सी. पाठक यांचे तृतीय चिरंजीव श्री. सुहास यांचा शुभविवाह सौ. कां. वैजयंती आपटे यांच्याशी मुंबई येथील सरदारगृहात दिनांक १ जुलै रोजी मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. वधूवरांना शुभाशिष प्रदान करण्यासाठी विविध क्षेत्रातील नामवंत मंडळी हजर होती.

# गुरुमाऊलीचे बारा प्रकार

(१) **' धातुवादी ' गुरु :–** हा शिष्याकडून तिर्थाटन करवून नाना साधने सांगून शेवटी ज्ञानप्राप्ति करून देतो.

(२) **चंदन गुरु :–** हा चंदनवृक्ष जसा आपल्याजवळच्या वृक्षांना आपल्या सारखाच चंदन बनवितो (पण हिंगण, वेळू व केळ शिवाय करून) तसा अभक्त शिवाय करून आपल्या केवळ समागमानेच हा भक्तास तारून नेतो!

(३) **' विचार ' गुरु :–** हा नित्यानित्य, सदसद्, सारासार विचाराने शिष्यास ज्ञान देऊन पिपीलिका मार्गाने साक्षात्कार करून देतो.

(४) **' अनुग्रह ' गुरु :–** हा शिष्यावर कृपानुग्रह करितो, त्याच्या प्रतापानेच सायास न होता शिष्यास ज्ञान होते.

(५) **' परिस ' गुरु :–** परिस ज्याप्रमाणे स्पर्शमात्राने लोहाचे सुवर्ण बनवितो त्याप्रमाणे हा करस्पर्शाने साधकास दिव्यज्ञान देतो.

(६) **" कच्छप " गुरु :–** कूर्म म्हणजे कासवी ज्याप्रमाणे नुसत्या अवलोकनाने पिलांचे पोषण करिते, त्याप्रमाणे हा कृपावलोकनानेच शिष्याचा उद्धार करितो.

(७) **" चंद्र " गुरु :–** चंद्र उदय पावताच चंद्रकांतास पाझर फुटतो, त्याचप्रमाणे या गुरूचे अंतर दयावंत होताच दूरचे शिष्यही तरतात.

(८) **" दर्पण " गुरु :–** आरशात पाहिल्याबरोबर आपले मुख आपणास दिसते, त्याचप्रमाणे ह्याच्या नुसत्या दर्शनाने स्वरूपज्ञान होते; कसलेच सायास पडत नाहीत.

(९) **छाया निधि गुरु :–** छायानिधी नावाचा एक मोठा पक्षी आकाशात फिरत असतो. त्याची छाया ज्याच्यावर पडते तो राजा होतो. त्याप्रमाणे ह्या योग्याची छाया ज्या पुरुषावर पडते, तो तात्काळ स्वानंद साम्राज्याधिपति होतो.

(१०) **नादनिधि गुरु :–** नादनिधि नावाचा मणि आहे; ज्या धातुंचे ध्वनी ह्याच्या कानात पडतात, त्या सर्व धातु स्वस्थानी सुवर्ण बनतात. त्याप्रमाणे मुमुक्षूची कारुण्यवाणी ह्याच्या कानी पडताच मुमुक्षूस दिव्य ज्ञान होते.

(११) **क्रौंचपक्षी गुरु :–** क्रौंच नावाची पक्षिणी समुद्रतिरी पिले ठेवून चारा घेण्यासाठी सहासहा महिने दूरदेशी फिरावयास जाते व वारंवार आका-

शाकडे डोळे करून पिलांची आठवण करिते, त्यायोगे पिले असतील तेथे पुष्ट होतात. त्याचप्रमाणे हा गुरु ज्यांची आठवण करितो, ते आपापल्या स्थानी असताच तरून जातात.

(१२) सुर्यकांत गुरु :– सूर्यदर्शनाने सूर्यकांत मण्यात अथवा भिंगात एकदम अग्नि पडतो व खाली धरलेला कापूस जळून जातो. (सूर्याची इच्छा नसतानाहि) त्याप्रमाणे ह्या गुरूची दृष्टि जिकडे म्हणून झळकते ते पुरुष तात्काळ विदेहत्व पावतात.

ह्यापैकी पहिले तीन करून शिवाय बाकीचे असाधारण कोटींतील गुरु, असाधारण अधिकाराच्या शिष्यासच लाभतात.

## ॐ साईबाबा

थोर मनाचे अनंत गुणांचे शिरडीचे राजे
साईनाथ माझे बाबा साईनाथ माझे.
अति दयाळू अति कृपाळू कनवाळू बाबा
शरणांगति अभय देती माझे साईबाबा ।।थोर।।
ठेवा श्रद्धा धरा सबुरी करा नित्य सेवा
चमत्कार दाखवतील पहा माझे साईबाबा ।।थोर।।
उदी पवित्र चरणतीर्थ हे रोज सेवन करा
साईबाबांचे नामस्मरण नित्य नेमे स्मरा ।।थोर।।
अति पवित्र अति पावन बाबांचे नाम
नित्य नेमे स्मरता होईल जिवनाचे काम ।।थोर।।
ॐ साईबाबा मंत्र नित्य हा जपा ।।
होईल पहा मग श्रीसाईबाबांची कृपा ।।थोर।।
अति सोपे अति साधे हे भक्तिचे साधन
शुद्ध मनाने करिता होईल मोक्षाचे साधन ।।थोर।।
हात जोडूनी मागतो एकच वरदान
जन्मोजन्मी मनीं बसावें आपुलेच ध्यान ।।थोर।।

– वसंत मनोरे

# शिरडीतील महत्वाचा उत्सव-गुरूपौर्णिमा

आषाढ शु।। पौर्णिमा–हा व्यासपूजेचा दिवस. श्रीव्यासांच्या कालापासून ह्या दिवशी गुरूची पूजा करून गुरूंना वस्त्रे देण्याची वहिवाट असल्याचा दाखला पुराणांतरी सापडतो.

शिर्डीस श्रीबाबांनी ह्या पूजेचे महत्त्व स्वतः आपल्या नेहमीच्या पद्धती-प्रमाणे अपरोक्ष मार्गाने सांगितले.

इ. सनं १९०८ रा. लक्ष्मण कृष्णाजी उर्फ तात्यासाहेब नूलकर, सबजज्ज मु. पंढरपूर, हे रजा घेऊन शिरडीस राहिले होते. त्यावेळी त्यांचा मुक्काम चावडीत होता.

एके दिवशी सकाळी श्रीबाबा माधवराव देशपांडे याना म्हणाले की, "त्या म्हाताऱ्याला म्हणावे की, या खांबाची पूजा कर." (तात्यासाहेब नूलकरांना बाबा म्हातारा म्हणत) पूजेकरिता जो खांब बाबांनी दाखविला तो धुनीजवळ असून त्याला टेकून कित्येक वेळा (सकाळी नेहमी) बाबा बसत. नूल्करांना व माधवरावांना हा काय प्रकार आहे ते प्रथम लक्षात येईना. नूलकरांनी पंचां-गात काही खुलासा मिळतो की काय ते बघण्याकरिता पंचांग पाहिले तेव्हा तो दिवस व्यासपूजेचा म्हणजे गुरुपूजेचा आहे असे आढळून आले. अशा त्या महत्त्वाच्या दिवशी खांबाची का होईना पण मशिदीत पूजा करण्याचा योग आल्यामुळे त्यांना परमानंद झाला. माधवराव देशपांडे पुन्हा मशिदीत गेले, तेव्हा बाबा त्यांनाही म्हणाले की, "तोच काय एकटा पूजा करतो; तुलाही करायला काय झाले?" माधवराव म्हणाले की, "आपण खांबाची पूजा नाही करणार, जर तुम्ही करू द्याल तर तुमची मात्र पूजा करीन." शेवटी नाही होय करता श्रीबाबांची पूजा करण्याची परवानगी मिळाली. बाबांचे भक्त श्री. रा. रा. दादासाहेब केळकर यांना गुरुपौर्णिमेच्या पूजेची माहिती होती. तात्या गणपत पाटील (कोते) शेतावर गेले होते. त्यांना बोलावून आणिले. मंडळींनी पूजेचे सामान तयार केले, धोतरे आणविली व सर्वांनी प्रत्यक्ष श्री बाबांची पूजा करून त्यांना वस्त्रे दिली. वस्त्रांचा बाबांना काही उपयोग नव्ह-ताच. परंतु आपल्या भक्तमंडळींना गुरुपौर्णिमेस गुरुची पूजा करण्याचा योग यावा व पुढे तो परिपाठ चालू रहावा याकरताच हे सर्व लाघव श्रीबाबांनी केले. अशा रीतीने ही पूजा सुरू झाली व नंतर या समारंभास हलके हलके मोठ्या उत्सवाचे स्वरूप आले. हल्ली हा उत्सव मोठ्या थाटाने तीन दिवस साजरा होत असतो.

# बाबांची पुण्याई

[ कु. संजिवनी मुळे, बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे ]

माझ्या वडिलांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. रोगाचं निदान होत नव्हते, ताप वाढतच होता. दिवसेंदिवस प्रकृति खालावत होती. डॉक्टरांनी विषमज्वराचे निदान केले. औषधोपचार चालूच होते. फरक पडण्याची चिन्हं नव्हती. तापाला उतार नव्हता. तो वाढतच होता. अन् अचानक डोळे पिवळे दिसायला लागले. डॉक्टर समजून चुकले कि ही काविळ आहे. काविळ रोग दिसायला साधा पण माणसाची सर्व शक्तिच नाहीसा करणारा. डॉक्टर मनोमन घाबरले होते. रोगाच्या विरुद्ध उपचार झाले होते. आम्ही सर्व चिंतातुर होतो. काविळीचे प्रमाण वाढतच होते. साईबाबांना आळवत होतो. संकटात धीर दे म्हणून विनवत होतो. चुकीच्या औषधोपचाराने काही विपरित परिणाम तर होणार नाही ना? ही एकच चिंता मनाला ग्रासत होती. आई तर समाधीपाशी जाऊन मूक अश्रू ढाळत होती. अन् एकाएकी ताप नॉर्मल आला. काविळीचे प्रमाण कमी होत गेले. साईबाबांचे आशीर्वाद पाठीशी होते. सहा महिने काविळीशी झगडत वडिल पूर्ण बरे झाले. सर्वांच्या चेहऱ्यावरचे मावळलेले हास्य परत आले. साईबाबांच्या थोर पुण्याईने आमच्या घराला संजीवन दिले. बाबांची मूर्ति रोज स्वप्नात येऊन शांत रहाण्यास सांगत होती, ते हे सूचित करण्यासाठीच !

● ● ●

---

❁ विजकपातीमुळे छापखान्यावरील वेळेची बंधने आणि नियतकालिकात छापला जाणारा मजकूर सेन्सॉर करून घेऊन त्यावर डायरेक्टर ऑफ पब्लिसिटीच्या अधिकाऱ्यांची स्वाक्षरी व्हावी या नव्या सरकारी आदेशामुळे श्रीसाईलीलेचा चालू अंक बाहेर पडण्यास विलंब झाला आहे. पुढील अंक १ ऑगस्ट रोजी वाचकांच्या हाती येईल.

— का. संपादक

# श्रीसाईबोधामृत

## ( अध्याय ३३ )

ले. द. शं. टिपणीस

प्रथम संतदासगणू या अध्यायात श्रीगणेशाची स्तुति करून नंतर सांगतात की काही दिवसानंतर चांदोरकरादी शिष्य शिर्डीला आले. व बाबाना वंदन करून म्हणाले, "पुढे तुम्ही काही सांगणार होता ते सांगा, आम्ही फार उत्सुक व आतूर आहोत ऐकायला". चांदोरकरांची विनंति ऐकून बाबा हसून म्हणाले "ठीक आहे. नीट लक्षपूर्वक ऐका, सुखदुःखाचा अंत झाला की मुक्तस्थिति प्राप्त होते. हे मी पूर्वी सांगितले आहे. ही स्थिती प्राप्त होण्यास वागावे कसे ते आता सांगतो. देह प्रारब्ध भोगत असता सदसद्विचार शक्ती पूर्ण जागृत ठेवावी. सहज जे घडतं ते प्रारब्ध, परंतु आपण कर्म केल्याने जे घडतं ते देहप्रारब्ध नव्हे. चोर चोरी करतो, त्याला शिक्षा होते. हे शिक्षा भोगणे देहप्रारब्ध नव्हे. विष प्यायल्यावर मरण येते हे देह प्रारब्ध नव्हे. कारण ती सर्व केलेल्या कर्मांची फळं आहेत, धन्याला हुसकावून लावून कारकुनाचा मालक झाला तर हे त्या कारकूनाचे देह प्रारब्ध नव्हे. कारकून धनी होतो. मजेत राहतो. सुखात राहतो. पण धन्याचा घात करण्याचे त्याने जे पापकर्म केले त्याचे जे फल ते पुढील जन्मात गेले, ते संचित क्रियमाण झाले. संचीत क्रियमाणाप्रमाणे पुढील जन्म मिळतो. हे शहाणे जाणतात. मूर्खांना हे कळणे कठीण, देहप्रारब्ध योगे जे कारकूनपण आले होते ते पूर्ण न भोगल्याने जे बाकी राहिले ते पुढील जन्मासाठी शिल्लक पडले. अशा प्रकारे त्याने पुढील जन्माची तयारी केली. अशांचा जन्म मरणाचा फेरा कुठून चुकणार? ध्यानात घे की, कितीतरी पदवीधर आहेत. त्यातील काही योगी होतात, काही अधिकारी होतात. कोणी शिक्षक होतात, तर कोणी व्यापारी होतात. तर काही वक्ते होतात, आता सगळेच पदवीधर, सगळ्यांचा प्रयत्न सारखाच. मग ही भिन्नता का? कारण देहप्रारब्ध प्रयत्नाचे फल नव्हे. निखाऱ्यावर पाय दिला की पोळतो. हे पोळणे कर्म फल आहे, त्याला कारण त्याचे कर्तृत्व आहे. एकादा फुटपाथवर झोपला असता लॉरी फुटपाथवर चढून तो मरण पावला तर ते मरण देहप्रारब्ध आहे. कारण ही घटना हे झोपण्याचे फल नव्हे." चांदोरकरांनी शंका काढली की "या ठिकाणी देहप्रारब्ध म्हणावे आणि चोराला शिक्षा झाली की कर्मफल म्हणावे असं का? अधिकारी, डॉक्टर, वकील ही भिन्नता कर्मफलामुळे का म्हणू नये?" बाबा हसून म्हणाले, "अजून तुझी

समजूत पटली नाही. असं पहा, कित्येक खरे चोर असून पुराव्याभावी सुटून जातात, हे देह प्रारब्ध. एक तुरुंगात जातो. एक साव म्हणून मिरवतो. एकाला कृतीचे फळ मिळाले मग त्या सावाचे कोठे गेले? दोघांचे एकत्र कृत्य पण एक सुटतो व दुसरा शिक्षा भोगतो, कारण देह प्रारब्ध. देहप्रारब्ध कृत्यातील आहे, असे असले तरी त्या सावाचे पापफळ कुठे जायचे नाही. ते पुढील जन्माची शिल्लक होईल, म्हणजे संचित क्रियमाण होईल. हेच संचीत क्रियमाण पुढील जन्माचे प्रारब्ध होईल. देह प्रारब्ध भोगीत असता आपण वागावे कसे ते सांगतो. नीट ऐक, व त्याप्रमाणे आचरण ठेव.

प्रारब्ध भोगीत असता सदानीतीचे पालन करण्यात जागृत असावे. सज्जनांची संगत करावी, त्यांच्यात मिसळावे. दुष्ट, दुर्जन, अभक्त यांच्या सावलीसही उभे राहू नये. अभक्ष भक्षण करू नये. खोटे वचन देऊ नये, एकदा वचन दिल्यास ते प्रामाणिकपणे पाळावे. शरिरात 'काम' झाल्यास स्वस्त्रीशी रमावे. दुसऱ्याची सुंदर स्त्री पाहुन विकारवश होऊ नये. संयम पाळावा. कामलोलुप व स्त्रीलंपट होऊ नये. सर्व षड्रिपूत काम हा मोठा भयंकर आहे. तो चित्त कधीही स्थिर होऊ देत नाही. म्हणून कामाचे सेवन प्रमाणात करावे. विवेकाचे लोढणे त्याच्या गळयात बांधल्याने हे शक्य होईल. देहप्रारब्ध भोगण्यापुरता षड्रिपूना मान द्यावा. तेवढयाच प्रमाणात ते भोगावे. हरिनामाबद्दल लोभ असावा व अनीतिबद्दल क्रोध व्हावा. मोक्षाची आशा धरावी आणि परमार्थाचा मोह असावा. दुष्कृत्याचा मत्सर करावा व भक्ति परमेश्वरावर असावी, संतसज्जनांच्या कथा ऐकाव्यात. चित्त नेहमी शुद्ध ठेवावे. आई वडिलांचा मान राखावा. आईची सेवा केली तर सहस्त्र तीर्थे केल्याचे पुण्य मिळते. वडिलांचे चांगले गुण ओळखून त्यांचे अनुकरण करावे. भावाशी प्रेमाने वागावे, व भगिनीना अंतर देऊ नये. पत्नीला प्रेमाने वागवावे पण तिच्या आहारी जाऊ नये. गृहकृत्यात तिच्या मताला मान द्यावा. पुत्र व सून यांच्यात कलह होईल असं वागू नये व बोलू नये. केवळ पैसा वा धनदौलत पाहून जरठ कन्येचा विवाह करू नये. आपल्या कन्येस योग्य व सुलक्षणी जावई मिळावा. हा पुरुषधर्म तुला सांगितला. आता स्त्रीधर्म सांगतो.

पति हाच स्त्रीचा देव. त्याची सेवा करणे हाच तिचा धर्म. संसारात पतीला साहाय्य करावे व सदोदीत आनंदी व समाधानी असावे. असं जी वागते तीच स्त्री धन्य होय. तिलाच गृहलक्ष्मी म्हणावे. स्त्रीयांनी विनयशील असावे. विनय हा स्त्रीचा अलंकार आहे. छचोर चाळे करू नये. परपुरुषाशीच नव्हे

तर जवळल्या नातेवाईकाशीही एकांतात भाषण करू नये. जवळच्या नात्यातला असला तरी तो पुरुष आहे. हे लक्षात ठेवून जागृत असावे. स्त्रीला बंधन असणे जरूर आहे. कारण एकच. स्त्रीदेह. स्त्रीदेहावर समाजातीलच नव्हे, तर कुटुंबातील दुष्टांची वाईट नजर असते. ही नजर समाजात अनीति माजवते. यात स्त्रीचा काही दोष असतोच असं नाही. शेळी ही लांडग्याचे भक्ष आहे. त्याची वाईट नजर तिच्यावर असते, म्हणून तिचे संरक्षण करण्यासाठी आपण शेळीला बंदोबस्तात ठेवतो व तिच्या संरक्षणाची व्यवस्था करतोच की नाही? तसेच स्त्रीचं, स्त्रीने समाजात सर्व प्रकारच्या सावधगिरीने वागणे जरूर आहे. याचा अर्थ स्त्रीवर विनाकारण बंधने असावीत असा नाही. या एकाच कारणापुरती स्त्री बंधनात असावी. पावित्र्याचे व्रत सांभाळून स्त्रीयांनी समाजात मिसळायला हरकत नाही. स्त्रीयांनी मुलांचे संगोपन दक्षतेने. करावे, व ती सन्मार्गाला लागतील असे शिक्षण त्यांना द्यावे. सासु, सासरे, दीर, जावा यांचा द्वेष करू नये. पतीच्या अनुमतीने एकादे तरी व्रत आचरावे. चार चौघानी आपल्या पासून चार गुण शिकावेत असे आचरण असावे. प्रारब्धे करून वैधव्य आल्यास ब्रम्हचर्य व्रत पाळून व्रतवैकल्ये, अध्यात्म चिंतन व सत्संगती यात वेळ घालवावा. कामोद्दीपक करणारे काही वाचू नये वा ऐकू नये. ही सर्व साधारण स्त्रीनीति तुला सांगितली. स्त्रीपुरुषांनी जर या नीतिचे पालन केले तर त्यांची बद्धस्थिती दूर होईल.

आता बद्ध कोणाला म्हणावे म्हणून विचारशील. बद्धस्थितीची लक्षणे ऐक. जो धर्माधर्म जाणत नाही. ईश्वर ओळखत नाही व ज्याच्या मनात सद्‌भावना नसतात तो बद्ध होय. कपटी, कटुवचनी, साधुसंत न ओळखणारा, व सदैव प्रपंचात गुरफटलेला तो बद्ध. दानधर्म न करणारा, कर्ज बुडवून चैन करणारा, सज्जनांची निंदा करणारा तो बद्ध, मित्राशी द्रोह करणारा, गुरुशी वैर करणारा, धर्मावर विश्वास नसलेला बद्ध होय. अंगी विद्वत्ता पुष्कळ. पण चित्त शुद्धि नाही, तो बद्ध. बद्धाला सत्संगती घडत नाही व त्याला सद्‌गती मिळत नाही, तो यमलोकी जातो.

आता मुमुक्षू कोणाला म्हणावे ते सांगतो. बद्धस्थितीचा ज्याला कंटाळा आला, ज्याच्या मनी सद्‌विचार येतात, व जो देवाच्या भेटीला आसावलेला असतो तो मुमुक्षू. जगाला असार मानणारा व प्रपंचाला विटलेला तो मुमुक्षू. देह प्रारब्धे करून जी स्थिती लाभली तीत समाधान मानून तो आनंदाने राहतो पाप व असत्य यांची त्याला भिती वाटते. म्हणून तो त्यांच्या वाटेस जात नाही. ज्याला केलेल्या कर्माचा खराखुरा पश्चाताप झाला आहे, तो पतीत असला

तरी मुमुक्षू समजावा. त्याला देवाविषयी प्रेम असते. साधुसंतांच्या ठिकाणी तो नम्र होतो. तो नीतीचा भोक्ता असतो.

साधक कसा असतो ते पहा. साधकाच्या जिव्हेवर सदैव हरिनाम असते. विषय त्याला विषासमान असून आपल्या अध्यात्मिक प्रगतीसाठी तो सतत प्रयत्नशील असतो. त्याला एकांत प्रिय असतो. कारण, एकांतात हरीचे ध्यान उत्तम प्रकारे होते. हरीचे गुणानुवाद ऐकून तो सद्‌गतीत होतो. सदैव समागम साधणारा व चित्तातील ईश्वराशी एकात्मता साधणारा असा तो संत असतो.

निंदा स्तुति, मानापमान ज्याच्या मनाला शिवत नाहीत तो सिद्ध. त्याच्या ठिकाणी संकल्प विकल्प नसतात, जनताजनार्दन त्याला एकरूप दिसतात. षड्रिपुंचीही बाधा त्याला होत नाही. त्याला देहाची पर्वा नसते. मीच ब्रम्ह आहे अशी त्याची भावना असते. सुखदुःख तो समान मानतो. असा हा सिद्ध असतो. ही चार प्रकारची भक्ताची स्थिति सांगितली. आता, या चार पायऱ्या कशा चढून जाव्यात, त्याचे ही मार्गदर्शन करतो. ते नीट ऐक. त्यावर विचार मनन कर व ते आचरणात आणण्याचा सतत प्रयत्न कर.

तुला जे दिसते, ते हे सगळे चराचर ईश्वराचे रूप आहे. ईश्वर नाही अशी जागा नाही. तो सगळीकडे सर्वांत आहे. पण मायेने तो झाकला आहे. माया आपणास तो दिसू देत नाही. मी काय, तू काय, इथला प्रत्येक प्राणच ईश्वराचा अंश आहे. मग कोणीकोणाचा द्वेष करणे म्हणजे स्वतः स्वतःचा द्वेष करणे नव्हे काय ? म्हणून कोणाचाही द्वेष करू नये. ईश्वराचे सर्वास्तित्व ध्यानी घेत गेले म्हणजे माणूस निगर्वी होतो. निगर्वीपणा साध्य झाला की, मग अध्यात्मातील अनेक गोष्टी हळू हळू साध्य होतात. माणसाचे चित्त चंचल, अस्थिर आहे. त्याला स्थिर केले पाहिजे. माशी सगळया वस्तुंवर बसते, पण अग्नी पाहून पळून जाते. तसं आपल हे रंगेल व रगेल मन सर्व ठिकाणी रमते, पण ब्रम्ह पाहून तोंड चुकवून पळून जाते, हे ओढाळ मन ब्रम्हांशी संलग्न झाल्या-खेरीज जन्म मरणाचा फेरा चुकणार नाहीं. हा फेरा चुकविणे तर मानव जन्माचे ध्येय आहे व तसा तो चुकविणे यातच जीवनाचे सार्थक आहे. म्हणून हे मन स्थिर करण्यासाठी कोणत्या प्रकारे भक्ती करावी ते सांगतो.

मन स्थिर करण्यास सोपा मार्ग म्हणजे मूर्तिपूजा—सगुणोपासना. मूर्तीत देव आहे अशी पूर्ण भावना, निष्ठा ठेवून मूर्तीच्या ठायी मन एकाग्र करावे. एकाग्रतेशिवाय मनाला स्थिरता येणार नाही. पुढे चिंतन मनन ध्यान करावे. अध्यात्म वाचावा. त्यात सांगितल्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करावा. अशा प्रकारे अध्यात्मविद्या प्राप्त झाली की, मोक्ष हाती आला. अशांचा श्रीहरी

अंकीत असतो. परंतू संसारीजनांना हे सर्व करणे परिस्थितिमुळे कठीण जाईल, म्हणून अशांना एक सोपा मार्ग सांगतो. सदैव ईश्वराची आठवण करून निष्काम भावनेने व कृष्णार्पण वृत्तीने मी जे संसाराबद्दल मागे सांगितले, त्या-प्रमाणे वागून संसार करावा. नेहमी साधुसंतांचे दर्शन घ्यावे. त्यांची संगत करावी. वयपरत्वे संसारातील ममता कमी] करून अंतसमयी कशाचीही आस ठेवू नये. मन एकाग्र करून प्रभू आठवावा, आपले जे आराध्य दैवत त्याचे ध्यान करावे. या ध्यानात अंत झाल्यास समीपता मुक्ति मिळेल. असं बोलून बाबांनी चांदोरकरांच्या शिरी हस्त ठेवला.

साईचरणी लीन होऊन चांदोरकर बोलले, "हे परमउद्धारा मायबापा तूच आम्हाला तारणारा आहेस. आज तू आम्हास दिव्य ज्ञान दिलेस. नावेने जसे पैलतीरास न्यावे, तसे तू आम्हास केलेस. अशीच कृपा असावी." तेव्हा साईनाथ हसून बोलले "तुम्ही माझे भक्त. मी कधीतरी तुम्हास विसरेन काय? काळजी करु नका. अल्ला, श्रीराम तुमचे कल्याण करील. सर्व कोड पुरविल. हे माझे वचन आहे." यानंतर दासगणू सांगतात की बाबांनी ही एक प्रकारे ज्ञानाची मेजवानीच केली. यात ज्ञान, वैराग्य, व भक्ति ही पक्वाने होती. त्यातील ज्याला जे रुचेल, आवडेल व पचेल ते त्याने भरपूर खावे असा बाबांचा आग्रह आहे. त्यांनी एकादा तुकडा जरी आपणाकडे फेकला तरी आपण कृतार्थ होऊ, मग सर्व मेजवानी दिली तर आपलं किती भलं होईल, हे नीट ध्यानात आणा. अशी सर्व भक्तांना विनंती करून जो कोणी हे तीन अध्याय निष्ठेने एकदा जरी वाचील, त्यास शत अश्वमेधांचे पुण्य मिळेल. असा आशिर्वाद देऊन दासगणू हा अध्याय संपवतात.

॥ श्रीसाईनाथार्पणअस्तु ॥

❁ ❁ ❁

# श्री सा ई ना थ

## ( श्रीसद्गुरू साईमहाराज ललित चरित्र )

श्री. र. श्री. पुजारी, पुणे

### ४९. प्राण गेला तरी दिलेले वचन मोडणार नाही

रस्त्यावरून रखडत चालणाऱ्या अनवाणी माणसाला कधी कधी फार सुंदर स्वप्ने पडतात. त्या स्वप्नात तो एक राजा असतो. राजवाड्यात राहात असतो. चांदीसोन्याचे दागिने घातलेल्या हत्तीच्या अंबारीमधून मिरवीत असतो.

गयेच्या धर्मशाळेत उतरलेल्या दिवशी कोणी भविष्यकाराने येऊन मास्तरांना 'तुम्ही या गावात हत्तीच्या अंबारीतून मिरवाल' असे भविष्य सांगितले असते तर, मास्तरांनी त्याला वेड्यात काढले असते! पण ते भविष्य आज शब्दशः खरे आले.

मास्तरांना हत्तीवर बसवून, स्वतः पालखीत बसून तो गयावळ त्यांना घेऊन मोठ्या आनंदाने विष्णुपदावर गेला. तेथे देवास पूजा, अभिषेक वगैरे सर्व शास्त्रोक्त रीतीने करविले. देवास नैवेद्य, ब्राम्हणभोजन, पिंडदान वगैरेही करून झाले. एकंदरीत गयेची यात्राही अत्यंत आनंदाने, समाधानाने पार पडली. हे पाहून आप्पा पाटलांना मास्तर क्षणोक्षणी म्हणू लागले "आप्पा, बघितले, बाबांचा वशिला कोठपावेतो पोचतो तो! बाबांचा वशिला लावण्यासाठी त्यांचा निरोप नको, चिठ्ठी नको, ते काही एक नको! पाहिजे ती एक बाबांची कृपा!"

एक दिवस संध्याकाळच्या सुमारास तो गयावळ आणि मास्तर त्या प्रशस्त सुंदर वाड्याच्या वरच्या मजल्यावरील एका दालनात, मोठ्या प्रेमाच्या गोष्टी बोलत बसले असताना, बाबा आपले वचन पाळण्यात किती काटेकोर आहेत, याविषयीच्या गोष्टी मास्तर सांगू लागले. म्हणाले--

"बाळकृष्ण विश्वनाथ उर्फ बाळासाहेब देव नावाचे बाबांचे एक परम भक्त आहेत. ते त्यावेळी डहाणूस मामलेदार होते. एक दिवस त्यांचे जोगांना पत्र आले. त्या पत्रात त्यांनी लिहिले होते, येथे आमच्या घरी मातोश्रींच्या

व्रतांचे उद्यापन आहे. दो-दोनशे ब्राम्हण त्यासाठी सांगितले आहेत. कार्तिक वद्य द्वादशी ही तिथी निश्चित केली आहे.

आम्ही पोटाच्या मागे लागून सरकारचे ताबेदार झालेले लोक! मला येथून कसे हलता येणार? तरी कृपा करून माझ्यावतीने आपण श्रीबाबांना त्या दिवशी येथे येण्याचे निमंत्रण करावे. आपण स्वतःच त्यांना घेऊन यावे. बाबांशिवाय कार्याची सिद्धता होणार नाही. तरी एवढी या दीन दासास भीक घालावी. अशी त्यांच्या चरणी माझ्या वतीने प्रार्थना करावी. पत्राच्या उत्तराची आतुरतेने वाट पहात आहे.

देवांचा भाव शुद्ध. बाबांनी त्यांचे पत्र संपूर्ण ऐकले. मग जोगांना बाबा म्हणाले, अरे, ज्याला माझी आठवण, त्याची आठवण मला येणार नाहीं काय? त्याची आठवण मला पदोपदी येते. मला गाडी नको, घोडा नको, काही एक नको. त्याने मला खऱ्या भावाने हाक मारली ना? मग मी तिथे आहेच! आणि हे बघ, आता असे कर. त्याला लगेच कागद धाड. त्यात लिही. म्हणावे : आम्ही तिघेजण येऊ. बाबा, मी आणखी तिसरा एक कोणी तरी! हे वाचूनसुद्धा त्याला आनंद होईल बघ!

बाबांनी असे लिहिले पण ते कोठले शिरडी सोडून जायला! निमगाव-रुई-रहाते यांच्या पलीकडे ते कधी गेलेलेसुद्धा नव्हते ! मग एवढ्या दूरच्या त्या गावी – दोनशे मैलावरील डहाणूला ते कोठले जाणार!

असो. पुढे काही दिवसानी व्रतांच्या उद्यापनाचा तो दिवस उजाडला. सकाळ पासूनच देव बाबांची आतुरतेने वाट पाहू लागले. बाबांना घेऊन जोग आता येतील, मग येतील असे म्हणत आत–बाहेर करू लागले. पण पत्ता नाही.

तोच देवांच्या घरासमोरील परांजपे वकीलांच्या दारासमोर एक टांगा येऊन थांबलेला त्यांनी पाहिला.

टांगा पाहाताच देवांचे मन पुन्हा आनंदले. वाटले : बाबा आले. पण पुरती निराशाच पदरी आली. बाबांच्या ऐवजी टांग्यातून उतरला तो गोर-क्षणाचे कार्य करणारा एक बंगाली संन्यासी!

तो संन्यासी एक महिन्यापूर्वी देवांना भेटला होता. त्यावेळी देवांनी त्यांना सांगितले होते. "गावात एका सार्वजनिक कार्यासाठी नुकतीच आम्ही वर्गणी गोळा केली आहे. अशा परिस्थितीत गोरक्षणाच्या तुमच्या कार्याला

लोक पैसे कोठून देणार? तुम्ही चार महिन्यानी पुन्हा एकदा या. त्यावेळी आपण चार लोकांकडे जाऊन खटपट करु.

असे असताना हा संन्यासी एकच महिन्यात पुन्हा दाराशी कसा काय हजर झाला! आश्चर्य आहे!.

देवांच्या मनात त्या संन्याशाविषयी काहीसा किंतू निर्माण झाला. मनाशी म्हणाले. आज घरी धर्मकार्य. त्यानिमित्त ब्राम्हणभोजन. पाने मांडायची वेळ झालेली, अशा घाईच्या वेळी हा संन्यासी माझ्याकडे पैसे मागण्यासाठी आला. याला काय म्हणावे! या लोकाना काळ-वेळ काही समजते की नाहीं!

त्याला पाहून देव मनाशीच एवढा विचार करतात तोच, तो संन्यासी त्यांच्याच दारात उभा! देवांना तो म्हणत होता : मैं आज पैसे के लिये आया नहीं हूं। हमें केवल भोजन चाहिये!

देव त्याला म्हणाले : आनंद की बात है। जरूर आना। ए घर अप-नाहि समझिएगा।

एवढ्यात तो संन्यासी म्हणाला : हमारे साथ दो बच्चे भी हैं। देव म्हणाले : बहोत अच्छी बात है। उनको भी ले आना। मगर एक बात पूछता हूं। आपका उतारा कहां है ? वहां मैं आपको बुलाने के वास्ते आऊंगा

तो संन्यासी म्हणाला, कुछ जरुरत नहीं। मैं खुदही आऊंगा। किस घंटे मैं हाजिर रहूँ ? जो वक्त आप कहेंगे, उस वक्तपर हाजिर रहूंगा।

देव म्हणाले : अच्छा बच्चे लेके बारा घंटे होने के वक्त हाजिर रहना। आप मानो मेरे यहां के साधु-संत ही हैं।

असो. याप्रमाणें सांगून तो संन्यासी निघून गेला. मग बरोबर बाराच्या ठोक्यास तो आणखी दोघांना बरोबर घेऊन देवांच्या घरी हजर झाला. भोजन केले. तृप्त होऊन ते निघून गेले.

परंतु देवांच्या मनाची रुखरुख काही केल्या कमी होईना. त्यांनी बापुसाहेबांना पत्र लिहिले. त्यात लिहिले की, बाबांनी मला येतो असे सांगूनही फसविले. शेवटच्या क्षणापर्यंत मी त्यांची वाट पाहिली. पण ते आले नाहीत.

शिरडीस ते पत्र बापुसाहेब जोगांनी बाबांना वाचून दाखविले. तेव्हा बाबा म्हणाले : अरे, त्याने असे कसे लिहिले आहे? 'आम्ही तिघेजण येऊ' असे मी म्हटले होते. त्याप्रमाणें मी गेलो. पण त्यानेच मला ओळखले नाहीं, त्याला मी काय करु? त्याला वाटले मी पैसे मागायलाच त्याच्याकडे गेलो! असो. त्याला पत्र लिही. आणि खूण दे, म्हणावे, संन्यासवेषाने आधी मी एक-टाच नाहीं का येऊन गेलो?

बाबारे, एकदा मी एखाद्याला वचन दिले की तो तो रामबाण! तो परत कसा येईल बरे!

अरे, प्राण गेला तरी दिलेले वचन मी कधी मोडणार नाही. पाहा तूच विचार करुन! वचन दिले आणि ते मी मोडले असे आजवर कधी झाले आहे का?

मास्तर पुढे सांगू लागले. म्हणाले : बाबांनी हे वचन प्रत्यक्षात तरी दिलेले. पण स्वप्नात येऊन दिलले वचनही हरिश्चंद्राप्रमाणे बाबांनी पुरे केले. कसे ते पाहा :

एका फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला अण्णासाहेब दाभोळकरांना एक स्वप्न पडले.

त्या स्वप्नात एका संन्याशाच्या वेषाने बाबा आले हलवून दाभोळकरांना जागे केले व म्हणाले : मी आज तुझ्याकडे भोजनासाठी येणार आहे.

जागे होऊन दाभोळकर पाहातात तर कोणीही नाही. तो तेजःपुंज संन्यासीही कोठे अदृश्य झालेला. मात्र त्याचा तो गोड आवाज, स्वच्छ शब्द कानात जसेच्या तसे घुमत आहेत! मनावर कोरलेले आहेत, मी आज तुझ्या-कडे भोजनासाठी येणार आहे.

त्या स्वप्नाचा अर्थ दाभोळकर मनात समजले. पत्नीस एक पावशेर तांदूळ अधिक घालण्यास सांगितले. यावर त्यांच्या पत्नीने चौकशी केली, आज कोणी पाहुणे भोजनासाठी येणार आहेत वाटते!

दाभोळकरांनी मनाशी विचार केला, सर्वांना सर्व गोष्टी सांगण्यात काय मतलब! कदाचित इतराना त्या गोष्टी कळणारही नाहीत. व्यर्थ कुचेष्टा मात्र व्हायची!

साहजिकच अण्णासाहेब दाभोळकरांनी या बाबतीत मौन धरले. पण स्त्रीचा स्वभाव, त्यांना मौन धरू देणार थोडाच! खोदखोदून त्या विचारू लागल्या तेव्हा, वस्तुस्थिती सांगणे अण्णासाहेबांना भागच पडले.

यावर त्या म्हणाल्या शिरडीमधील पंचपक्वाने टाकून बाबा येथे कशाला येतील? मी सांगते, बाबा मुळीच येणार नाहीत.

हे ऐकून अण्णासाहेब म्हणाले बाबा स्वतः न आले तर न येवोत. पण कोणी अतिथी, वारकरी, पांथस्थ, भिकारी – कोणी ना कोणी येईलच की नाही! एक पावशेर तांदुळाची वाण आपणाकडे आहे असेही नाही. मग या शंकाकुशंका तरी कशासाठी?

पण मनोमन मला जे वाटते ते सांगतो असे स्वप्न सहसा खोटे ठरत

नाहीं. बाबांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, स्वप्नात दिलेले वचनसुद्धा बाबा मोडणार नाहींत.

असो. पुढे दुपारची वेळ होताच होळीचे पूजन वगैरे होऊन सर्वांची पाने मांडली. सुंदर रांगोळ्या काढल्या. अण्णासाहेबांचे कन्या, पुत्र, जावई, नातवंडे असा सर्व परिवार पानावर येऊन बसला. सुरुवातीस पानात वाढायचे ते वाढूनही झाले. पण मध्यवर्ती ठिकाणी जे मुख्य पान मांडले होते, त्या पानावर बसण्यास अजून कोणीही आले नाही! ते पान रिकामेच!

हे पाहून अण्णासाहेब मनात अस्वस्थ झाले. आत बाहेर करू लागले. रस्त्यावरून आपल्या घराकडे कोणी येत आहे का ते पाहू लागले. परंतु कोणीही पाहुणा, अतिथी, ब्राम्हण त्यांच्या घराकडे वळला नाही. व वळताना दिसला नाही.

हे पाहून अण्णासाहेब निराश झाले. माणसाना पानावर तिष्ठत तरी किती वेळ ठेवायचे असा विचार केला. दारास कडी लावली. अन्नशुद्धिवाढून होताच आपोष्णी घेतली. 'पार्वतीपते हर हर महादेव' असे म्हणून आता प्राणाहूती घेणार तोच, जिन्यावर कोणाशीची पावले वाजली. पाठोपाठ कानावर शब्द आले रावसाहेब कोठे राहातात? येथेच ना?

अण्णासाहेब तसेच पानावरुन उठले. दाराची कडी काढून पाहिली. तर दोन मुसलमान गृहस्थ दारात उभे!

समोर वाढलेली पाने. त्यावर बसलेले स्त्री-पुरुष. ते गृहस्थ संकोचले. म्हणाले आम्ही अगदी अवेळी आलो. माफी असावी. पण एक महत्वाची वस्तू आपणाकडे पोचती करावी म्हणून आम्ही आलो होतो.

त्यांच्या हातात कागदात गुंडाळलेली एक तसबीर होती. तिच्यावरील वृत्तपत्राचे वेष्टन दूर करुन अण्णासाहेब पाहातात, तो काय! ती तसबीर बाबांची होती!

भोजनाच्या या क्षणी स्वप्नात दिलेले वचन पुरे करण्यासाठी बाबा या रूपाने आले होते! रिकाम्या राहिलेल्या आपल्या पानावर स्थानापन्न होणार होते!"

## ५० मी जी आमच्या दरबाराची मंडळी म्हणालो ती हीच!

मास्तरांनी सांगितलेल्या बाबांच्या या दोन लीला ऐकून तो गवावळ स्वतःशी विचार करू लागला. म्हणाला : बारा वर्षापूर्वी आपल्या इच्छेने बाबा माझ्या घरी आले, ज्या अर्थी ते आले, त्या अर्थी येण्यात त्यांचा काही हेतूही असला पाहिजे. काही ना काही कामाशिवाय कोणी कोणाकडे जात नाही.

बाबांचा येथे येण्यामागे कोणता हेतू असेल बरे?

शामरावांना चकित करणे हा? छट्! एवढाच काही हेतू असणार नाही! त्याहून फार व्यापक हेतू त्यामागे असला पाहिजे.

तुटलेली अंतःकरणे जोडणे, सर्व भरतखंड म्हणजे एक हृदय, एक मस्तक, एक धर्म हे सर्वांना सांगणे– शिकविणे हा हेतू त्यामागे असला पाहिजे. निश्चितच असला पाहिजे. अन्यथा या त्रिस्थळीच्या अखेरच्या टप्प्यावर ते येऊन बसले नसते. दक्षिणेतील शिरडीशी उत्तरेकडील हे स्थान त्यांनी असे जोडले नसते!

तो गयावळ काही बोलणार तोच शामराव म्हणाले, "कोठे गया! आणि कोठे शिरडी! पण बाबांचे बिनतारी तारायंत्र येथेही येऊन पोचलं! केवळ येथेच नव्हे तर, मद्रास, कलकत्ता, रामेश्वर, मथुरा येथेही जाऊन ते पोचले!

कोठेही थोडे खुट्ट झाले की त्याची बातमी बाबांना! आता तुम्ही आणि मी येथे बसून बोलत आहो. हे सर्व बाबांना माहीत आहे. कालपासून माझ्या मनात एक विचार सारखा येत आहे. तो हा की, आपला सोन्याचा दंड माझ्या हाती देऊन लग्न-मुंजीच्या क्षुल्लक निमित्ताने बाबांनी मला या भागात मुद्दाम पाठविले तर नाहीं!".

गुरुपीठाचा हा संदेश कोणाकोणास अकल्पितपणे जाऊन कसा पोचतो, त्यांना ओढून शिरडीस कसे आणतो, नियोजित कार्य त्यांच्यावर कसे सोपवितो याविषयी आता शामराव बोलू लागले.

म्हणाले, "ज्या माणसांनी शिरडी हा शब्द कानानी पूर्वी कधी ऐकलासुद्धा नाही अशी माणसे नेहमी शिरडीस येतात. मुक्काम करतात. मनाशी गुप्तपणे बाळगलेले मनोगत बाबांपुढे व्यक्त करतात. इच्छिलेले फळ प्राप्त होताच बाबांचा निरोप घेऊन बाहेर पडतात. पण हे त्यांच्या त्यावेळी ध्यानी येत नाहीं. त्यांच्या हातावर आवळा ठेवून बाबांनी त्यांच्याकडून कोहाळा काढला आहे !

भाईजी, फार सांगत नाही. चार दोन उदाहरणे सांगतो.

बाबांकडून पैसे लाटण्यासाठी मद्रदेशीय यात्रेकरूंचा एक भजनी मेळा शिरडीकडे वळला. पण शेवटी बाबांनी त्यांना दिले काय? तर भक्ती! घडविले काय? तर श्रीरामाचे दर्शन! दाखविले काय? तर स्वरूप!

तीच गोष्ट काकाजी वैद्य या सप्तशृंगीदेवीच्या पुजाऱ्याची. त्या पुजाऱ्यांना बाबांनी शिरडीत बारा दिवस ठेवून घेतले. पूर्ण मनःशांतीचा लाभ त्यांना करविला. पण परत जाताना जी शिदोरी बांधून दिली ती पुन्हा मनः-

शांतीहूनही अत्यंत श्रेष्ठ अशी! 'स्व'–रूप पाहून नित्य आत्मानंदात मग्न राहाण्याची! आत्मतेजाचा दीप नंदादीपाप्रमाणे अखंड तेवत ठेवण्याची!

जवळच्या रहाते गावाचे खुशालभाऊ मारवाडी असोत; मुंबईचे पंजाबी ब्राम्हण रामलाल असोत; राली बंधू या ग्रीक व्यापाऱ्यांच्या पदरी असलेले मुनशी लखमीचंद असोत; किंवा बऱ्हाणपूरच्या चिडीबाई असोत– या ना त्या मार्गाने बाबांनी त्यांना शिरडीस बोलावून घेतले. जणू पायाला दोरा बांधून शिरडीस ओढून आणलेल्या त्या सर्व चिडियाँ – चिमण्या!

खुशालभाऊंना दुपारच्या वेळी स्वप्नात जाऊन बोलावून घेतले. रामलालला शिरडीस येण्याचा निरोप स्वप्नात मुंबईस जाऊन दिला. लखमीचंदाला सांताक्रूझमध्ये स्वप्नात जाऊन परिचय नसतानासुद्धा दर्शन दिले. तर चिडीबाईला स्वप्नात दर्शन देऊन तिच्याकडे खिचडीचे भोजन मागितले

या सर्व मंडळींचे भाग्य किती वर्णावे! स्वतः बाबांनी ज्यांना बोलावून घेतले त्यांची पूर्वपुण्याई खरोखरच फार मोठी असली पाहिजे! बाबा म्हणतात त्याप्रमाणे हे त्यांच्या दरबारचे लोक असले पाहिजेत. त्याविना बाबा स्वतःहून त्यांच्याकडे जाणार नाहींत. निमंत्रण देणार नाहींत.

खुशालभाऊंच्या भेटीच्या तळमळीने बाबांनी भर दोन प्रहरीच काकासाहेब दीक्षितांना टांगा घेऊन पाठविले! काकाजी वैद्यांना आणण्यासाठी सात शिखरे असलेल्या त्या अवघड स्थानी माझी रवानगी केली! स्वप्नातील स्वतःची म्हणजे, त्या म्हाताऱ्या दाढीवाल्याची ओळख पटविण्यासाठी, दासगणूंची त्यांनी कीर्तनात मांडलेल्या आपल्या तसबिरीची योजना केली!

कोणाला आपला परिचय तसबिरींच्या दुकानातील तसबिरीवरून करून दिला. कोणाला आपल्या निरोपाची खूण खिचडी खाऊन दिली. कोणाची सांजा खाण्याची इच्छा त्याला प्रसादाचा भरपूर सांजा खायला घालून तृप्त केली. जणू ही सर्व बाबांची लाडकी लेकरे! काही कारणाने दुरावलेली लेकरे!

पण या सर्वांत अगदी स्पष्टपणे प्रेमभाव प्रकट केला तो, ॲडव्होकेट बाळाराम धुरंधर यांच्याबद्दल!

धुरंधर कुटुंब हरिभक्तांचे. साधी, बाळबोध राहाणी. धन, विद्या, कीर्ती यांचा लाभ होऊनही नम्र विचारसरणी. नित्य संतसंग, नित्य धर्मग्रंथांचे वाचन, मनन, परिशीलन. जणु यांचे घरातील पिढ्यापिढ्यांच्या स्त्रीपुरुषांनी ईश्वरभक्तीचा नंदादीप अखंडपणे तेवत ठेवला! त्या पवित्र दीपाच्या साक्षीने सर्व व्यवहार केले!

अशा कुटुंबातील सात्विक, शांत, भगवद्‌भक्त बाळारामांना बाबांनी आपल्या दरबारातील मानकरी मानावे, यात काहीच आश्चर्य नाही.

ज्या दिवशी बाळाराम धुरंधर आपल्या कुटुंबियांसमवेत शिरडीस आले, त्याच्या आधीच बाबा आम्हा सर्वांना मशिदीत म्हणाले : " आज माझ्या दरबारचे पुष्कळ लोक येथे येणार आहेत. "

पुढे थोड्याच वेळात ही मंडळी आली. बाबांच्या चरणी मिठी घातली. जवळ बसवून घेऊन मोठ्या प्रेमाच्या गोष्टी चालल्या. हे पाहून आम्हा मंडळींना आश्चर्य वाटले. तेव्हा बाबा पुन्हा म्हणाले. मी जी आमच्या दरबारची मंडळी म्हणालो ती हीच बरे! यांची आमची ओळख आजची नाहीं. आज साठ पिढ्यांची आहे.

बाबांच्या तोंडचे हे शब्द ऐकून ते सर्व विनयशील बंधू आणखीच नम्र झाले. अंगावर भक्तिप्रेमाचे रोमांच उभे राहिले. कंठ रुद्ध झाला. डोळ्यांमधून अश्रू वाहू लागले.

ही त्यांची भक्ती पाहून बाबा म्हणाले भक्ती असावी तर अशी! शुक्लपक्षातील वाढत जाणाऱ्या चंद्रकोरीप्रमाणे! अरे, ज्याची श्रद्धा गुरुचरणी दृढ झाली, तो गुरुरुपच झाला! देवाच्या गळ्यातील तो ताईतच झाला! त्याच्याकडे वाकड्या नजरेने पाहाण्याची कोणाची छाती आहे! म्हणून ज्याचा प्रत्येक श्वास हरिचिंतनाने चालला, त्याला हा भवसागर म्हणजे केवळ गुडघाभर पाणी!

असो. त्यानंतर ही मंडळी वाड्यात गेली. भोजन केले. थोडी विश्रांती घेतली. मग पुन्हा तिसऱ्या प्रहरी मशिदीत जाऊन बाबांच्या चरणी मस्तक ठेवले. बाळाराम बाबांच्या पायांशी बसून भक्तिभावनेने बाबांचे पाय चेपू लागले. तेव्हा काही बोलण्याऐवजी हातातील चिलीम बाबांनी त्याच्या पुढे केली. ओढण्याची खूण केली.

हे पाहून बाळाराम बुचकळ्यात पडले. मनाशी म्हणाले : सर्व आयुष्यात तंबाखूस मी कधी स्पर्शही केला नाहीं. तो वासही सहन झाला नाहीं. पण तीच गोष्ट बाबांच्या हातून आज पुढे आली. प्रसादरूप होऊन आली. अशा वेळी माझी इच्छा मी का चालवावी? जी इच्छा सद्गुरुंची तीच माझी." धुरंधरांनी प्रसाद म्हणून बाबांची चिलीम हाती धरली. तिला वंदन केले. मोठ्या प्रयासाने ती ओढली. पुन्हा एकवार वंदन करून ती बाबांच्या हाती परत दिली.

त्या क्षणापासून बाळारामांची दम्याची उबळ आतल्या आत शांत झाली. जणू दम्याचा विकार त्यांना कधी होता की नव्हता!

## ५१. तुझी भेट झाल्याविना मी पाठ फिरविणार नाही.

म्हणून भाईजी, मी म्हणतो की, इतर दैवताकडे आपणास जावे लागते; तर हे आमचे शिरडीचे दैवत चालून आपल्या घरी येते. एकदा नव्हे, दोनदा नव्हे, तर अनेकदा आपले दार ठोठावते. पण आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. दार उघडीत नाहीं.

आपण दार उघडीत नाहीं, हे पाहूनही हे दैवत परत जात नाही. म्हणते तुझी-माझी भेट झाल्याविना मी पाठ फिरविणार नाहीं. तुझे हित तुला समजत नसले तरी, तुझ्याकडे दुर्लक्ष करून मी निघून जाणार नाहीं. येथेच थांबेन. शेवटपर्यंत थांबेन."

मास्तर त्या गयावळाला अक्कलकोटच्या सपटणेकर वकीलांची हकिगत सांगू लागले. म्हणाले –

"इंग्रजी शिक्षणामुळे माणसाची मूळ विचारसरणी बदलते. तसे त्या सपटणेकर वकिलांचे झाले. वकिलीचा अभ्यास एकत्र करताना त्यांच्या हातून एका साईभक्ताची हेटाळणी झाली. म्हणजे पर्यायाने बाबांचीच हेटाळणी घडली.

सपटणेकर त्या साईभक्तांना त्यावेळी म्हणाले "अहो शेवडे! अभ्यास न करता कधी कोणी वकिलीची परीक्षा पास झाला आहे! तुम्ही म्हणता 'पास होशील' असा आशीर्वाद तुम्हांला बाबांनी दिला! आता तुम्ही, तुमची ती परीक्षा, आणि बाबा काय ते पाहून घ्या. तुमची ही गुरुभक्ती आमच्या मात्र अकलेपलिकडची आहे!"

सद्गुरुपेक्षा प्रयत्नांवर श्रद्धा असणारे सपटणेकर, अभ्यास करून वकिलीची परीक्षा पास झाले. अक्कलकोटास वकीली करू लागले. धंद्यात पैसाही त्यांनी चांगला कमावला. पण एक उणीव आयुष्यात निर्माण झाली. ती म्हणजे मनःशांती! मनःशांती काही केल्या त्यांना लाभेना.

मनःशांती नष्ट होण्याचे आणखी एक कारण घडले. त्यांचा एकुलता एक पुत्र घटसर्प होऊन तडकाफडकी वारला.

वकिलीची परीक्षा दिली तेव्हाची उमेद सपटणेकरांना आता आठवू लागली. ती उमेद अवघ्या दहाच वर्षात पार खचली. ती वकीली नको, तो पैसा नको, ती कीर्ती नको असे त्यांना होऊन गेले. गाणगापूर, पंढरपूर इत्यादी क्षेत्रांच्या तीर्थयात्राही करून झाल्या. वेदांतही वाचला. पण मनःस्थितीत काहीही फरक नाही!

अशा मनःस्थितीत असतानाच, दहा वर्षापूर्वीचा शेवडचांशी झालेला संवाद सपटणेकरांना आठवला.

शेवडचांची श्रद्धा, अभ्यास कच्चा असूनही त्यांना लाभलेले यश, प्राप्त झालेली मनाची अखंड शांति – याविषयीच ते एक सारखा विचार करू लागले. म्हणू लागले, कोण असेल बरे तो शिरडीचा फकीर? त्याच्या दर्शनाला

तरी एकदा जावे. त्या फकीराविषयी काही एक माहिती नसताना त्यावेळी मी त्याची हेटाळणी केली. परीक्षा मला लाभली; पैसा आणि कीर्तीही लाभली; पण मन:शांती लाभली नाहीं. पुत्ररत्नही लाभले नाहीं. या गोष्टींचा संबंध त्या फकीराशी तरी काही नसावा! गुरुनिंदा हातून घडली याबद्दल झालेली ही शिक्षा तर नव्हे!

मनात असा विचार येण्याचा अवकाश, सपटणेकर शिरडीस येण्यास निघाले. आधारास सोबत लहान बंधू आणि पत्नी यांनाही घेतले.

बाबांचे दर्शन शिरडीत त्यांना झाले मात्र — मनास अत्यंत समाधान झाले. दोन्ही हात जोडून बाबांसमोर उभे राहिले. नंतर चरणी लोटांगण घेतले. बरोबर आणलेले श्रीफळ बाबांच्या चरणी मोठ्या भक्तीने ठेवले. तोच बाबा सपटणेकर वकीलांवर ओरडले "चल हट्!"

बाबांचा तो धि:कार, संताप, तिरस्कार पाहून सपटणेकरांना फारच दु:ख झाले. काय करावे हे त्यांना सुचेना. एवढ्यात बाळा शिंप्याचे नाव कोणी सुचवले. म्हणाले "बाळा शिंपी बाबांची समजूत काढून म्हणाला वा नीट दर्शन घडविल. आशीर्वाद द्या असे सांगेल.

सपटणेकर बाळा शिंप्याकडे गेले. त्याच्या सांगण्याप्रमाणे बाबांचे काहीं फोटो विकत आणले. दोघेजण मशिदीत गेले. तेव्हा बाळा शिंप्याने त्यातील एका फोटोकडे बोट दाखवून बाबांना विचारले, देवा हे कसले चित्र आहे? यावर सपटणेकरांकडे बोट दाखवून बाबा म्हणाले, हा फोटोतील माणूस याचा मैतर आहे.

बाबांचे हे गमतीचे बोलणे ऐकून मशिदीतील सर्वजण हसू लागले. बाबाही हसू लागले. ही संधी सपटणेकरांना पुढे करण्यास चांगली आहे, असे बाळा शिंप्यास वाटले. बाबांचे दर्शन झटकन घेण्यास त्याने सपटणेकरांना सांगितले.

यामुळे धीर येऊन सपटणेकर आता बाबांचे दर्शन घेणार तोच, त्यांच्या कानी रागाचे शब्द आले, "चल हट्!"

आता काय करावे? बाबांचा राग ओसरणार तरी केव्हा? असा विचार करीत सपटणेकर हात जोडून उभे आहेत, तोच तीव्रपणे उच्चारलेले बाबांचे शब्द त्यांच्या कानावर आले. बाबा म्हणाले, चालता हो येथून! माझ्या डोळ्यां-समोर सुद्धा उभा राहू नकोस!

बाबांनी केलेल्या या संभावनेमुळे सपटणेकर अतिशय दु:खी झाले. बाबांची आज्ञा म्हणून सपटणेकरांनी लगेच शिरडी सोडली. अक्कलकोटास आले. पुन्हा गाणगापूर, पंढरपूर यात्रा सुरू झाली. पण मन:शांति म्हणून लाभेना. मनाचे जळणे संपेना. अखेर विश्रांतिसाठी आपल्या माढेगावी गेले.

तेथे विचार केला की, काशीयात्रा तरी करून पाहावी. म्हणजे तरी मनास थोडी विश्रांति मिळेल. म्हणून काशीयात्रेचा बेत केला. सर्व तयारी केली. उद्या निघणार, तोच आज रात्री सपटणेकरांच्या तेरा-चौदा वर्षे वयाच्या पत्नीस स्वप्न पडले. जागी होऊन, पतीस उठवून ती म्हणाली –

स्वप्नात कडेवर घागर घेऊन लक्कडशाच्या विहिरीवर मी गेले. तर तेथे निंबाच्या झाडाखाली डोक्यास फडके बांधून एक फकीर बसला होता. तो माझ्याजवळ आला. प्रेमळपणे माझ्याकडे पाहून म्हणाला – बाळ, आण ती घागर इकडे! मी देतो तुला विहिरीतून घागर भरून! मुली, तुझा जीव केवढा! बाई, तुला घागर कशी येईल काढायला!

त्या फकिराची मला भिती वाटली. म्हणून घागर तशीच घेऊन मी घराकडे पळत सुटले. भीतीने वळून पाहाते तर तो फकीर माझ्या मागे मागेच! आणि मी जागी झाले.

एवढे स्वप्न पत्नीच्या तोंडून ऐकले मात्र, सपटणेकरांनी बेत बदलला. काशी ऐवजी शिरडीस निघाले.

शिरडीस येताच सपटणेकर प्रथम मशिदीकडे गेले. बाबा लेंडीवर गेले होते म्हणून तेथेच थांबले. थोड्या वेळाने बाबा लेंडीवरून परत आले. त्यांना पाहाताच सपटणेकरांची पत्नी बालसुलभ आश्चर्याने म्हणाली, मी स्वप्नात पाहिला तो फकीर हाच! हाच की!

मग ती बाला बाबांकडे कुतुहलाने पाहू लागली. बाबांच्या प्रत्येक लहान सहान कृतीचेही मोठ्या भक्तीने अवलोकन करू लागली. हे पाहुन बाबांना वात्सल्याचे भरते आले. आपल्या नेहमीच्या पद्धतीनुसार तेथील एका त्रयस्थ व्यक्तीला उद्देशून बाबा बोलू लागले. म्हणाले, काय करू! माझी कंबर, पोट, हात किती दिवस दुखायचे! पण, एकाही औषधाचा गुण नाही! आता बरीक काय जादू झाली बघा! सगळे दुखणे-खुपणे एकदम बंद!

बाबांचे हे उद्गार ऐकून ती स्त्री चकित झाली. मनात म्हणाली; माझे हे आजारीपण बाबांना कसे कळले! त्यांना कोणी सांगितले? हे फकीरबाबा खरेच देव असले पाहिजेत!

सपटणेकर विचार करू लागले. मनात म्हणाले: माझ्या पत्नीवर बाबांची कृपा झाली. मी मात्र पाषाणाप्रमाणे जशाच्या तसाच कोरडा राहिलो. 'चल हट!' या शब्दांखेरीज माझ्या वाट्यास दुसरे काहीही आले नाही!

काय असेल बरे याचे कारण?

कारण अगदी स्पष्टच आहे. मी गुरुनिंदक. कुतर्कवादी. संशयात्मा. माझे पाप माझ्या आड येत आहे. गुरुदापासून पुनःपुन्हा दूर लोटीत आहे.

अशा वेळी मी कोठे जावे ? पदरी घेण्याबाबत कोणास सांगावे ? माझे आता कोण आहे? बाबाच माझ्यावर कृपा करून, या पापी मुलाला पदरात घेतील. पदरात घेतील, तरच मी आयुष्यात उभा राहीन. थोडा तरी माणसात राहीन.

त्या दिवशी सपटणेकरांना अन्न गोड लागेना. डोळे मिटले तरी, निद्रा येईना. माशाप्रमाणे तळमळू लागले. म्हणू लागले. "बाबा, असे निष्ठुर होऊ नका. मला पुन:पुन्हा असे दूर लोटू नका."

अखेर त्यांचा त्यांनाच एक उपाय सुचला. उठले, धावतच मशिदीकडे गेले. बाबा एकटेच आहेत असे पाहून त्यांचे पाय घट्ट धरून रडू लागले.

बाबांनी शांतपणे त्यांच्या डोक्यावर कृपाहस्त ठेवला. त्यामुळे आनंदीत होऊन सपटणेकर बाबांचे पाय चेपू लागले. तोच कोणी एक धनगर जातीची स्त्री तेथे आली. तिला उद्देशून सपटणेकरांच्या पूर्वकर्माची कथाच जणू बाबा सांगू लागले. म्हणाले, अशी आहे त्या वाण्याची गोष्ट! पुरती ऐकलीस ना? त्या वाण्याचा मुलगा मेला तो हा । असा वध!

आता हात्र मनुष्य वध. हा मला म्हणतो की, त्याचा मुलगा मी मारला ! मी काय लोकांची पोरे मारतो? बरे, मारली असतील तर मी जिवंत करतो. पुन्हा त्याचा पोरगा त्याच्या पोटाला घालतो. मग तर झाले !

बाबांचे हे शब्द ऐकून सपटणेकरांना भरून आले. अनिमिष नेत्रांनी सपटणेकर बाबांकडे पाहू लागले तेव्हा सपटणेकरांच्या मस्तकावर हात ठेवून म्हणाले अरे तुला माहित नाहीं हे पाय फार पुरातन आहेत. फार पुरातन बरे ! असो. तुझी काळजी आता दूर झाली. ना? मग जा. माझ्यावर विश्वास ठेव. तुझे सर्व काही चांगले होईल.

मास्तरांनी सांगितलेली सपटणेकरांची ही कहाणी ऐकून तो गयावळ म्हणाला, "एकूण ही कथा दोन दिवसांची नव्हे तर ! चांगली दहा बारा वर्षांची दिसते. पण त्या सपटणेकरांचे भाग्य असे की बाबांनी त्यांना मध्येच सोडले नाही. शेवटपर्यंत आपल्या तळहातावर घेतले ! जणू चुकले माकलेले, अपराधाचा पश्चाताप होऊन पुन्हा घराच्या आश्रयाला आलेले हे कोणी एक लाडके लेकरू!

● ● ●

भावोत्कट प्रेमाख्यानातून आध्यात्माचा आविष्कार करणारे—

# जायसी

–विनायक पाठक.

**भक्ति - सोपान : ज्ञान आणि प्रेम :**

हिंदी साहित्य समृद्ध करण्यात हिंदु संत कविंचा सिंहाचा वाटा असला तरी, मुसलमान संत (सूफी–औलिया) यांनी वेळोवेळी केलेले मधुर साहित्य सृजन नजरेआड करता येणार नाहीं. संवत् १३७५ ते १७०० पर्यंत कालगणना असणाऱ्या हिंदी साहित्यातील भक्तिकालात, प्रेममार्गी व ज्ञानमार्गी असे दोन प्रमुख उपप्रवाह होते.

निर्गुण निराकार रूपात परमेश्वरभक्तीची सुमधुर अभिव्यक्ति करणारे ते प्रेममार्गी व ज्ञानमार्गी कवि, व सगुणोपासना करून भक्तीचा भारदस्त भावाविष्कार करणारे रामभक्ती संप्रदायाचे प्रवर्तक, तर कृष्णभक्तीचे गुणगान गाणारे कृष्ण भक्त संप्रदायाचे प्रवाचक, असे ढोवळमानाने भक्तिकाळाचे वर्गिकरण करण्यात येते.

ज्ञानमार्गी संप्रदायाचे प्रमुख कवि कबीर, प्रेममार्गी प्रवाहाचे प्रमुख कवि जायसी, रामभक्ति शाखेचे प्रमुख कवि तुलसीदास, तर कृष्णभक्ति संप्रदायाचे मुख्य कवि म्हणून, सूरदास यांचा नेहमी निर्देश करण्यात येतो.

मागील तीन चार अंकातून आम्ही कबीर, तुलसी, विद्यापती, सूरदास, मीरा आदि संत कविंचा, त्यांच्या काव्याचा, सिद्धांतांचा व आदर्शांचा ओझरता परिचय करून दिल्याचे आपल्या स्मरणात असेलच ! आज आपण प्रेममार्गी उत्कट भक्तीचा आविष्कार करणाऱ्या, जायसींचा परिचय करून घेऊ या.

**जीवन परिचय :**

जायसींचे संपूर्ण नाव मलिक मुहंम्मद जायसी. यांचा जन्म संवत १५५० च्या आसपास झाला असे ग्राह्य मानण्यात येते. ते जायस नगरचे राहणारे म्हणून जायसी या नावानेच ओळखले जाऊ लागले. त्यांच्या वास्तव्यासंबंधीचे दोन बोलके उल्लेख त्यांच्या 'पदुमावति' व 'आखिरी' कलाम या ग्रंथात आढळतात. ते असे :–

(१) "जायस नगर धरम अस्थानू
तहाँ आई कवि कीन्ह बखानू ॥"

(२) "जायस नगर मोर अस्थानू
नगर के नाव आदि उदयानू ॥"

वरील उल्लेखावरून ते जायस या नगरचे राहणारे असून त्या नगरचे मूळ नाव उदयन असावे असे दिसते.

**कुणाला हसतोस ?**

मलिक मुहम्मद जायसी हे रूपाने फारच कुरुप असून, त्यांचा एक डोळा तिरळा होता. त्यांचे ते ध्यान पाहून दिल्लीचा त्यावेळेचा शहेनशहा शेरशहा उपहासाने हसला. आपल्या रूपाची अशी चेष्टा करणाऱ्या शेरशहाला त्यांनी मोठ्या शांतपणे उत्तर दिले.

"मोहि कों हँससि कि कोहरहि?"

(हे बादशहा तू मला हसतोस की, मला निर्माण करणाऱ्या त्या अल्लाला हसतोस? हा भावार्थ) जायसीचे हे अर्थपूर्ण उत्तर ऐकून शेरशहा मनात खजील झाला व त्याबद्दल त्याने खेदही प्रगट केला.

## नेमस्त दिनचर्या

शांत आणि समंजस स्वभावाचे जायसी, विरक्तिकडे न कळत कल असला, तरी भ्रमंती करणाऱ्या फकीरागत ते कधीच राहिले नाहींत. "कष्ट करावे । पोट भरावे" हीच त्यांची सर्वसाधारण शेतकऱ्याप्रमाणे दिनचर्या होती.

**महारोग्यासंगे भोजना बसती :**

जायसींना एकांत आवडत असूनही एकटे जेवणे त्यांना कधीच जमत नसे-आवडत नसे! रोज कुणाला तरी बरोबर घेऊन जेवायला बसण्याची संवय ही पुढे संवय न राहता तो त्यांचा एक स्वभावच झाला होता. त्यामुळे रोज नेमाने कुणी ना कुणी त्यांच्याबरोबर जेवायला असेच ! पण एक दिवस मात्र असे घडले की, त्या दिवशी ते शेतात एकटेच होते. जेवायला सोबत नव्हती. माध्यान्हीचा समय झाला. पोटात कावळे ओरडू लागले. पण सोबत जेवायला बसवयाला कुणीच आढळेना. हा येईल तो येईल असे म्हणून वाट पाहता पाहता त्यांच्या सहनशीलतेची मर्यादा संपली. तोच एक महारोगी एका बाजूने येताना त्यांनी पाहिला. काय आनंद झाला! नेमस्त जायसींनी त्यालाच आपल्या बरोबर जेवावयास घेतले. उघ्टया खरकटयाचा अथवा त्याच्या किळसवाण्या रूपाचा, असा कोणताच विधिनिषेध न बाळगता अगदी स्थितप्रज्ञ वृत्तीने त्याचे सह अन्नग्रहण केले व असे म्हणतात की आनंदी जायसी समाधानाचा तृप्तीचा

देकर देता देताच तो महारोगी अंतर्धान झाला. आणि याच क्षणापासून जायसीला विलक्षण अंतर्ज्ञान झाले व "पिया मिलन की आस" दिवसेंदिवस वाढीस लागली.

## या भाग्याला आकाश ठेंगणे

जायसी चिश्ती संप्रदायाचे अनुयायी होते. त्यांनी लिहून ठेवलेल्या विस्तृत गुरुपरंपरेवरून ते त्यावेळी प्रसिद्ध असलेल्या चिश्ती, निजामुद्दिन ओलियाचे वंशज असावे असे मानण्यात येते. पूर्वसुकृत म्हणा किंवा योगायोग म्हणा, जायसींना शेख मुहीउद्दिन व सैयद अशरफ हे दोघे गुरु लाभले होते. सैयद अशरफ यांनी जायसींना दीक्षाही दिली. होती. आध्यात्म्याच्या दृष्टिने दोन समबल गुरुंची प्राप्ती होणे "या परते भाग्य न दुसरे!"

चिश्ती संप्रदायाचे अनुयायित्व, तत्कालीन सूफि संप्रदायात अभिप्रेत असलेल्या रागानुराग भक्तीची जवळीक, नाथसंप्रदायातील साधूंचा सहवास, व कबीर पंथीयांचा सहयोग, या अनेकविध कारणांनी जायसींची आध्यात्मिक दृष्टि खूपच चौकस व चौंरस झाली होती. व नकळत जायसींना वेदांत हठयोग साधना याविषयीचे बरेच सम्यक ज्ञान प्राप्त झाले होते. या सर्वांचा परिपाक आपल्याला त्यांच्या भावोत्कट प्रेमाख्यानात अभिव्यक्त झालेला आढळतो.

सूफी संप्रदायातील बहुतेक सर्वांनी प्रांजळपणे कबूल केले आहे की, सूफी मत मत–सूफी मत म्हणतात. त्यातील अनेक सिद्धांत भारतीय ज्ञानवंत व गुणवंत यांचेकडूनच ग्रहण केले आहेत. आणि म्हणूनच जायसींच्या प्रेमाख्यानात झालेली प्रेमाभिव्यक्ति, भारतीय योगशास्त्राशी व वेदांताशी खुप मिळतीजुळती आहे.

### त्रिगुणात्मक तीन ग्रंथ :

जायसींनी आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी काव्यलेखनाला सुरुवात केली. त्यांनी लिहिलेले "पद्मावत" (पदुमावति), "अखरावट" व "आखिरी कलाम" हे तीन ग्रंथ प्रसिद्ध होत.

'पद्मावत' म्हणजे मधुर रसांनी युक्त व विविध भावभावनांचा कल्लोळ असलेले एक महाकाव्य आहे. हिंदु लोक ज्याप्रमाणे रामायण आपला धर्मग्रंथ मानतात, त्याचप्रमाणे सूफी संप्रदायाचे लोक 'पद्मावत' महाकाव्य आपला धर्मग्रंथ मानतात. तुलसीदासांच्या 'रामचरित मानस' नंतर हिंदी साहित्यात लोकप्रियतेचा कळस गाठणारा ग्रंथ म्हणजे 'पद्मावत!'

हे महाकाव्य म्हणजे संपूर्ण प्रेमाख्यान आहे. यातील अर्धी कथा काल्पनिक व अर्धी ऐतिहासिक स्वरुपाची आहे. हा ग्रंथ फारसी भाषेतील प्रसिद्ध

असलेल्या मसनवी शैलीत लिहिले आहे. फारसीत प्रेम प्रधान काव्यालाच मसनवी शैली म्हणतात. या महाकाव्यातील पात्र व वातावरण चक्क भारतीयच आहेत. तथापि या प्रेमगाथेची रुपरेषा भारतीय असली तरी आतील गाभा मात्र सूफी प्रेम-पद्धतीचाच आढळतो.

या महाकाव्यात चितोडचा राजा रत्नसेन व सिंहलद्वीपाची राजकुमारी पद्मावती यांची प्रेमकथा आहे. राजा रत्नसेन पोपटाच्या तोंडून पद्मावतीच्या सौंदर्याची स्तुति ऐकून, तो तिच्या प्राप्तिसाठी वेडा होतो, व म्हणून तिच्याकडे जातो. रत्नसेनाची पत्नी नागमती ही रतिविरहाने व्याकूळ होते तसेच इकडे राघव चेतनकडून पद्मावतीचे वर्णन ऐकून अल्लाउद्दिनचे वेडे होणे चितोडवरील स्वारी, राजा रत्नसेनचे दिल्लीत कैद होणे, पद्मावतीची व्याकुळता, नागमतीच्या सतीत्वाची पराकाष्ठा, अशा अनेकविध भावपूर्ण घटना, जायसीनी फार कलात्मक रीतिने शब्दबद्ध केल्या आहेत.

### आध्यात्मिक रुपक

खरे पाहिलें तर संपूर्ण 'पद्मावत' म्हणजे एक सुंदर आध्यात्मिक रुपकच आहे. ते संपूर्ण रुपकच असें :

तन चितउर, मन राजा कीन्हा
हिय सिंघल, बुधि पद्मिनि चीन्हा ॥
गुरु सुआ जेई पंथ देखावा
बिनगुरु जगत को निरगुण पावा ॥
नागमती यह दुनिया धन्धा
बांधा सोई न एहि चित्त बन्धा ॥
राघव दूत सोई सैतानू
माया अलाउद्दिन सुलतानू ॥"

यात चितोडला शरीराचे, रत्नसेनला मनाचे, सिंहलद्वीपाला मायेचे, पद्मिनीला बुद्धिचे, पोपटाला गुरुचे, नागमतीला प्रापंचिक आकर्षणाचे, राघव-दूताला सैतानीवृत्तीचे व अल्लाउद्दिनाला मोह मायेचे प्रतिक कल्पून या महाकाव्यात लौकिक प्रेमकथेतून अलौकिक अध्यात्माचा कलापूर्ण आविष्कार केला आहे. लौकिक प्रेमगाथेच्या माध्यमातून अलौकिक पारमार्थिक सत्तेचे विश्लेषण हाच हे महाकाव्य लिहिण्यामागील जायसींचा मुख्य हेतू असावा. यातील नागमतीचे वियोगवर्णन म्हणजे हिंदी साहित्यातील विप्रलंभ शृंगाराचे अत्युत्तम मारूपण कनण्यात येते.

**अखरावट** : या ग्रंथात जायसींनी हिंदी वर्णमालेतील प्रत्येक अक्षरावर सूफी सिद्धान्ताचे काव्यमय चिंतन शब्दांकित केले आहे. 'अखरावट' म्हणजे जायसींच्या आध्यात्मिक व दार्शनिक चिंतनाचा परिपाकच आहे. हिंदीतील 'स' वर्णाविरील वानगी म्हणून त्यांच्या खालील ओळी मोठ्या अर्थपूर्ण आहेत :

"साँसा जो लहि दिन चारी
ठाकूर से करि लेहु चिन्हारी
अंध न रहहुं, होहुं डिठियारी
चीन्हि लेहु जो तींहि सँवारा ॥"

प्रेम रहस्याचा उलगडा करताना जायसी म्हणतात "कहा मुहम्मद प्रेम कहानी! सुनि सो ज्ञानी भये घियानी ॥" तत्वज्ञान्याना सुद्धा योगी बनविण्याचे सामर्थ्य आपल्या प्रेमाख्यानात आहे. हाच जायसींच्या सांगण्याचा मतितार्थ !

**आखिरी कलाम** : हा जायसींनी माणसाच्या मृत्यूनंतर होणाऱ्या जीवाच्या अवस्थेचे व प्रलय कार्यकारण परंपरा इत्यादींचे वर्णन केलेला छोटासा काव्यग्रंथ आहे. यातील जायसींनी केलेल्या प्रलयाचे (कयामत) वर्णन वाचून सांप्रतची परिस्थिति म्हणजे, येऊ घातलेल्या प्रलयाची विध्वंसाची नांदीच तर नाही ना असे वाटू लागते. प्रलय येतो तेव्हाच्या परिस्थिति संबंधी जायसी लिहितात.

"जबहिं अंतकर परलै आई । धममी लोग रहे ना पाई ॥ जबहिं सिद्ध साधु गए पारा। तबहि चलै चोर बटपारा । जाईहि माया मोह सब केरा उठि हैं पंडित बेद पुराना । दत्त-सत्र दोउ करिहि पयाना । धूम–बरन सूरज होई जाई । कृस्नबरन सब सिष्टि दिखाई ॥"

**मानवीय एकतेचा पुरस्कर्ता :**

हिंदु मुसलमान एकता एवढा एकच मर्यादित काव्यविषय जायसींचा नव्हता तर त्यांना आपल्या प्रेमकाव्याच्या माध्यमातून मानवीय एकता अभिप्रेत होती, आणि म्हणूनच त्यांनी आपल्या काव्याने तत्कालीन सुशिक्षित व अशिक्षित जनतेला अक्षरशः भारावून टाकले होते.

**प्रेमपंथाचा पायिक :**

मानवी जीवनाचा अंतीम हेतू प्रेम आहे, अशी जायसींची धारणा होती. "जो नहि सीस प्रेम पंथ लावा । सो प्रिथिमी काहेक आवा ?" असा प्रश्न रत्नसेनाकडून वदवून घेण्यात प्रेम महात्म्य सांगण्याचाच जायसींचा उद्देश होता.

**तारुण्याला आत्मसंयमाची आवश्यकता :**

"जीवन तुरी हाथ गहि लीजिय। जहा जाई तह जाइ न दीजिय । जीवन जोर मात गज अहै । गह हुं ज्ञान आंकुस जिमि रहै ॥" यात जायसींनी तारु-

त्याला आत्मसंयमाची आवश्यकता प्रतिपादिली आहे. मानवी जीवनात प्रेम आणि ज्ञान यांची सांगड हवी हे सांगताना जायसी म्हणतात, तारुण्य म्हणजे मस्तवाल हत्ती. त्यावर ताबा ठेवण्यासाठी ज्ञानाचा अंकुश या हातात हवा.

प्रेम म्हणजे एक नित्य, सुंदर, एकरस आणि एकांतिक आनंदप्रद पदार्थ आहे. या जगात प्रेमासारखी दुसरी कोणतीच गोष्ट सुंदर असू शकत नाही.

**प्रेमपंथ गान :**

राजा रत्नसेन पद्मावतीच्या प्रेमात पडल्यावर म्हणतो की "तीनि लोक चौदा खंड, सबै परै मोहि सुझि । प्रेम छांडि नहि लोन किछु । जो देखा मन बूझि

जायसींनी प्रेमाला अमरत्व प्राप्त करून देणारे महान तत्व म्हटले आहे. "सुनु धनि प्रेम सुके पिए । मरन जियन डर रहै न हिए ।।" यातील इंगित हेच आहे की प्रेम दिव्यत्वाला नेणारे व जन्म मृत्यूचेही भय लयास नेणारे आहे.

**'मी' पण सोडा 'तूं-तू' वदा :**

सर्वत्र 'मी-मी' या अहंकार बुद्धिमुळे माणूस दिव्य सुखाला पारखा होतो. अहंता सोडल्याशिवाय परमेश्वर प्राप्ति होत नाही असे जायसी सांगतात.

**यति आणि सति :**

जायसींनी पद्मावत या प्रेमकथेत यति आणि सती यांचे सुंदर विश्लेषण केले आहे. जो 'वायू' वर नियंत्रण ठेऊ शकतो, तो यति व कामिनी म्हणजे 'काम' विकारावर ताबा ठेऊं शकतो ती सती ! "पौन बॉध सो जगी जती । काम बॉध सी कामिनी सती।"

**मृत्यूची चाहूल :**

आपल्या प्रेमाख्यानातून भारतीय तत्वज्ञान, आध्यात्म व सूफीमत यांची कलात्मक सांगड घालणारे, लौकिक प्रेमकथेच्या माध्यमातून 'नौ पोरी' (नऊ ज्ञानेंद्रिये) 'पांच कोटवारा' (षड्रिपुंपैकी पाच रिपू) 'दसवं दुवार', ब्रम्हरंध्र, प्राणायाम, मनोनिग्रह, सुषुप्ना नाडी आदि विषयी मार्मिक विश्लेषण करणारे जायसी, आपल्या आयुष्याच्या अखेरीस पूर्ण विरक्त झाले.

एके दिवशी त्यांची सर्व कुटुंबीय मंडळी कोसळलेल्या घराच्या माती-विटांच्या ढिगाऱ्याखाली अक्षरश: गाडली गेली. व अशा तऱ्हेने मायेचे सर्व पाश आपसूकच तुटल्यामुळे, जायसी घरदार सोडून फिरते फकीर बनले व अमेठी नगरासमीप असणाऱ्या जंगलात राहू लागले.

आपल्या मृत्यूची चाहूल त्यांना आधीच लागली होती. राजा रामसिंह यांचेजवळ त्यांनी आपला मृत्यू कुणा शिकाऱ्याकडून होणार असल्याचे सांगितले होते. जायसीवरील नितांत प्रेमामुळे राजा रामसिंहाने त्या जंगलाचे आसपास शिकारीसही बंदी केली होती.

**भास कुणाला–नाश कुणाचा ?**

"विधिलिखित कुणी पुसुं शकेना" म्हणतात तेच शेवटी खरे! जायसी राहात त्या जंगलातून जाणाऱ्या कुण्या एका शिकाऱ्याला, वाघ आपलाच पाठलाग करीत असल्याचा भास झाला, व केवळ नाईलाज म्हणून त्याने स्वत:च्या संरक्षणासाठी म्हणून जी गोळी झाडली ती नेमकी जायसीलाच लागली. व आपल्या प्रेमाख्यानातून अध्यात्म्याची संजीवनी देणाऱ्या व ईश्वरप्राप्तीसाठी आतूर झालेल्या जायसींच्या आयुष्याची इतिश्री झाली. आजही अमेठी राज्यात असलेल्या जायसींच्या कबरीतून "इष्क इष्क अल्ला तू ही" चे स्वर निनादत असल्याचा भास होतो.

● ●

# अलका पुरीचा कुणी देवराणा

अलंका पुरीचा कुणी देवराणा
ज्ञाननाथ नाव जया शोभे ।१।
ज्ञानेंच भरला देहांतला कण
अक्षर अक्षरें साकारली ।२।
प्राशून अखंड विषाचा तो पेला
अमृताचे बोल प्रसवला ।३।
लावियेला वेलू विस्तारला किती
गगन मंडपा व्यापियेले ।४।
कुहर बोलतें साधुनिया क्षण
अध्यात्माचे गूढ चिरन्तन ।५।

– श्री· तु· नाईक

# मानवी मनाची झलक

संग्राहक–**बा. स. धामणकर**

मानवी मन हे एक अनाकलनीय कोडे आहे. व्यवहारात मन हा शब्द आपण फार ढिलाईने वापरतो. मन हा दोनच अक्षरांचा शब्द खरा, परंतु या दोन अक्षरी शब्दामध्ये, इतका व्यापक अर्थ–विस्तार सामावलेला आहे की, त्याच्या व्यापक अर्थाची कल्पना करता येणे महाकर्मकठीण. याच्या अगदी उलट, मन ही वस्तू इतकी अतीसूक्ष्म आहे की, ती वस्तू चर्मचक्षूनीं पाहता येत नाहीं. मनाची व्याख्या करता येत नाही. परंतु मनावरुनच मानवाची व्याख्या करता येते. ती म्हणजे, ज्याला नियतीकडून विकसनशील मनाची देणगी मिळाली आहे तो मानव. मनाची प्रभावशक्ती इतकी जबरदस्त की एकवेळ मानव जगज्जेता बनू शकेल. परंतु हाच महान पराक्रमी मानव आपल्या मनाचा दास असतो. मानवाचे सर्व व्यवहार हे त्याच्या मनाच्या आदेशानुरूप होत असतात, आणि व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने मनुष्याच्या कृतीवरुनच मनाच्या गुणधर्माची आपल्याला ओळख होते. मनाच्या गुणधर्माची विभागणी विश्वविख्यात तीन शब्दांनी करता येते. ते तीन शब्द म्हणजे, सत्व, रज, तम.

(१) सत्वगुणधर्म मनोधर्म :–

(१) सत्य–अहिंसा अस्तेय अपरिग्रह, भक्ती, प्रेम, निष्ठा, श्रद्धा आणि आणखी किती तरी.

(२) रजोगुणप्रधान मनोधर्म –

आशा, आकांक्षा, हव्यास, महत्वाकांक्षा, गर्व, आसक्ती, अहंकार आणि आणखी किती तरी.

(३) तमोगुणप्रधान मनोधर्म :–

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, संशय, भीती, आणि आणखी कितीतरी.

यातील काही मनोधर्म आपण जेव्हा जन्मास येतो, तेव्हाच त्यांचे गाठोडे आपल्याबरोबरच असते. जन्मल्यानंतर विविध संस्कारांनी आपले मनोधर्म बदलू शकतात. आपले कर्तव्य अगदी साधे आहे. आपण जास्तीत जास्त सत्वगुणप्रधान बनायचे. सत्वगुणी व्हायचे. आता मी मनासंबंधाने थोरा-मोठयांची संत, महात्म्याची काही उद्‌बोधक वचने देत आहे. हेतू हा :–

वाचा, विचार करा आणि पटतील ते विचार आचरणात आणा.

(१) जसे मन तसा मानव.

(२) प्रभूच्या मनाची लीला म्हणजे मानवी मन.

(३) सुखाची गुरुकिल्ली म्हणजे मनावर ताबा मिळविणे.

(४) शरीर आणि मन यांचा फार घनिष्ट संबंध आहे. एक रोगी असेल तर दुसरे निरोगी राहू शकत नाहीं.

(५) मन जितके अधिक सत्वगुणी, तितके ते अधिक बलवान.

(६) मनाच्या समुद्रावर विचार वासना, संकल्प यांच्या लाटांचे अखंड नृत्य चालू असते.

(७) इंद्रधनुष्यातील सात रंग ओळखता येतील पण, मनुष्याच्या मनातील सातवे रंग ओळखणे शक्य नाही.

(८) माणूस जगासाठी नसून जग मानवासाठी आहे. माणूस सुधारला तर जग सुधारेल, आणि माणसाची सुधारणा म्हणजे त्याच्या मनाचे उदात्तीकरण.

कोणी कोणी मानवी मनाचे दोन भाग करतात. एक बाह्य अथवा जागृत मन, आणि दुसरे अंतर्मन. आतापर्यंतचा विचार हा विशेषकरून बाह्य मनाचा झाला. आता अंतर्मनाच्या संबंधी काही वचने उद्धृत करतो.

(१) सुषुम्ना नाडीचेच दुसरे नाव अंतर्मन.

(२) समाधी ही अंतर्मनाची एक अवस्था आहे.

(३) अंतर्मन स्थलकालातीत असते तसेच ते त्रिकालज्ञ असते.

(४) नेहमीचे बाह्यमन हे त्रिमिती असते. अंतर्मन हे चतुर्मिती असते.

(५) अंतर्मन हे पंचमहाभूतावर सत्ता चालवू शकते.

(६) दूरदर्शन, दूरश्रवण, विचार संक्रमण, परकायाप्रवेश, वगैरे प्रवेश वगैरे सिद्धी या अंतर्मनाच्या शक्ती आहेत.

तर असे हे मन, अशा त्या थोर मनाला माझा नमस्कार.

## श्रीसाईनिकेतनमधील रामनवमी

प्रतिवर्षाप्रमाणे साईनिकेतन येथे रामनवमी (दिनांक २०–४–७५) उत्सव होणार आहे. असे साईलीला मासिकाच्या एप्रिल १९७५ च्या अंकात घोषित केलेले असल्यामुळे रविवारी दि. २०–४–७५ ला सकाळी ८॥ पासूनच साईभक्त साईनिकेतनच्या सभागृहात जमू लागले. प्रत्येकाने आपल्याबरोबर जे पूजासाहित्य आणले होते, ते त्याने आपल्यापरीने भक्तिभावाने पत्रपुष्प अर्पण करून साईबाबांची मनोभावे पूजा केली. आज साईबाबांच्या चेहऱ्यावरहि आगळेच तेज दिसत होते. साईबाबांचा अत्यंत प्रिय असलेला रामनवमीचा उत्सव, इतक्या वर्षानंतरहि तितक्याच भक्तिभावाने साजरा होत आहे. हे पाहूनच त्यांच्या चेहऱ्यावर ते तेज चढले असेल! नऊच्या सुमारास सभागृह बहुतेक

भरले व साईबाबांच्या पुजेस सुरुवात झाली. साईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक डॉ. श्री. दि. परचुरे ह्यांनी षोडशोपचारे बाबांची पूजा केली. श्री. श्रीराम देशपांडे ह्या दादर येथील एकनिष्ठ साईभक्तांनी पौरोहित्य केले व पूजा सांगितली.

हारांनी व फुलांनी अत्यंत शोभिवंत दिसणाऱ्या साईबाबांची इतर भक्त येऊन पूजा करितच होते, व आपआपला उपहार अर्पण करून पुढील कार्य-क्रमासाठी सभागृहात बसत होते. पूर्वी घोषित केल्याप्रमाणे दहिसर येथील एक निष्ठावंत साईभक्त श्री बी. आर. काकडे ह्यांचे कीर्तन योग्यवेळी सुरू होणार होतेच; परंतु तत्पूर्वी एक आगळाच समारंभ साईबाबांच्या समोर घडला. आणि तो म्हणजे लालबाग विभागातील सुप्रसिद्ध पत्रलेखक, समाजसेवक आणि आचार्य अत्रे सेवा संघ, (मुंबई शाखेचे) सरचिटणीस शशिकांत तोंडवळकर यांच्या "श्रीसाईगीतदर्शन" या काव्यसंग्रहाचे प्रकाशन. ह्या काव्यसंग्रहाचा व लेख-काचा परिचय करून देताना डॉ. श्री. दि. परचुरे म्हणाले, "प्रस्तुत पुस्तक मी नुकतेच चाळले. श्री. तोंडवळकरांचा व माझा परिचय ह्यापूर्वी नव्हता; परंतु आज हा काव्यसंग्रह पाहिल्यावर व त्यात त्यांचा जो परिचय करून देण्यात आला आहे तो वाचल्यावर, श्री. तोंडवळकर हे एक चांगले लेखक व गीतकार आहेत ह्याबद्दल माझी खात्री पटली आहे. ह्या संग्रहातील गीतांच्या चाली पाहिल्यावर ती गीते गेय आहेत असे वाटते. मी श्री. तोंडवळकर ह्यांना सुयश चिंततो, व श्री साईबाबा त्यांना अशीच काव्यस्फूर्ति देवोत, अशी साई चरणी प्रार्थना करून, सुप्रसिद्ध गीतकार श्री रमेश अणावकर ह्यांनी त्यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करावे, अशी मी त्यांना विनंती करतो."

यानंतर श्री. रमेश अणावकर आपल्या भाषणात म्हणाले, गीतकाराला गीत रचण्यासाठी स्फूर्ति मिळावी लागते, व ती त्याला प्रसंगाने मिळत असते. 'केशवा, माधवा, तुझ्या नामात रे गोडवा' हे माझे लोकप्रिय गीत रचण्याची स्फूर्ति मी असाच एका तीर्थाच्या ठिकाणी गेलो असता मला झाली. श्री साई-बाबांच्या चरित्रातील असे कित्येक प्रसंग आहेत की, जे कवींना सतत स्फुर्ति देत रहातील. श्री. तोंडवळकर ह्यांची गीते अशाच स्फूर्तितून निर्माण झालेली आहेत असे मला वाटते. त्यांनी आपला व्यासंग असाच चालू ठेवला तर, ह्या-पेक्षाहि अधिक सरस काव्यनिर्मिती त्यांच्या हातून होईल ह्याविषयी मला त्यांच्या प्रस्तुत काव्यसंग्रहावरून खात्री वाटते. त्यांचा हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला असे मी जाहीर करतो."

श्री. अणावकर ह्यांनी ग्रंथाचे प्रकाशन केल्यावर, संघाचे सल्लागार श्री. मोहन पाटील ह्यांनी उपस्थितांचे समयोचित शब्दात आभार मानले. सिनेनट

मा. भगवान पालव यांचे बंधु श्री. आप्पासाहेब पालव, समाजसेवक विठ्ठलराव बनकर, सुप्रसिद्ध गीतकार कमलाकर भागवत इत्यादी माननीय व्यक्ति वरील प्रसंगी उपस्थित होत्या. ह्यानंतर गीतकार श्री. शशिकांत तोंडवळकर ह्यांनी आपल्या काव्यसंग्रहातील दोन गीते म्हणून दाखविली. त्यावरुन गीतातील गेयता श्रोत्यांनां पटली.

प्रकाशन समारंभ चालू असतानाच श्री. काकडे आपल्या साथीदारांसह हजर झाले. साडेदहाच्या सुमारास त्यांनी आपल्या कीर्तनाची सुरवात केली. श्रीबाबांचे ते एकनिष्ठ भक्त असल्यामुळे, बाबांनी सांगितल्याप्रमाणे फक्त धोतर नेसून उघड्या अंगाने ते कीर्तनास उभे राहिले. त्यांनी बाबांच्या चरित्रावर कीर्तन केले व ज्याठिकाणी रामनवमीच्या उत्सवाचा संदर्भ आला त्याठिकाणी रामनवमीचे महत्वही विशद करून सांगितले. त्यांच्या कीर्तनातील पदे मराठी, हिंदी, कोकणी, संस्कृत इत्यादि विविध भाषांत ग्रंथित केलेली होती, त्यामुळे त्यांच्या कीर्तनाला आंतरभारतीचे स्वरूप आलेले होते. साईबाबांच्या चरित्रां-तील प्रसंग, आख्यायिका, घटना इत्यादि सर्वांमध्ये स्वतः कीर्तनकार इतके रंगून गेले होते की, त्यामुळे सर्व श्रोतृवर्गही तल्लीन होउन मंत्रमुग्ध झाला होता. श्री साईभक्तांना साईबाबांच्या चरित्राची इतकी अवीट गोडी आहे की, ते चरित्र कितीही वेळा ऐकले तरी ते त्यांना अपुरेच वाटते ! तबला पेटी-च्या सुरेल साथीमुळे कीर्तनाचा रंग उत्तरोत्तर वाढत गेला. कीर्तनाच्या मध्यं-तरात डॉ. परचुरे ह्यांनी कीर्तनकारांस हार घातला व सर्वांस बुक्का लावला. कितंनाच्या शेवटी तर श्री काकडे ह्यांचे भान एकदमच हरपले. पासष्ट वर्षांचा इतर कोणीही मनुष्य त्यांच्या इतका नाचून लोकांना कुंकू देऊ शकणार नाही. कोणत्याही प्रकारचा थकवा न येता ते अर्धातासपर्यंत सतत नाचगाण्यात रंगतात. हे केवळ बाबांच्या दैवी प्रसादाशिवाय होणे शक्य नाही. कीर्तनाच्या शेवटी आरती व श्री बाबांचे भजन होऊन प्रसाद व सुंठवडा वाटल्यावर हा अपूर्व सोहळा संपला. सुमारे दोन अडीचशे भक्त मंडळी ह्या सुमारे साडेतीन तास चाललेल्या कार्यक्रमास उपस्थित होती. "इथेच माझे पंढरपूर" अशा प्रकारचे उद्गार एका विट्ठलभक्ताच्या तोंडून ज्याप्रमाणे बाहेर पडले, त्याचप्रमाणे "इथेच माझी शिर्डी" अशा प्रकारचे उद्गार तो सर्व कार्यक्रम पाहून पुष्कळ भक्तांच्या तोंडून बाहेर पडले !

● ●

# काळ आलाच होता....

[ सौ. ऊषा प्रभाकर मुळे, शिर्डी ]

वर्तमानपत्रातील मजकूर परत परत वाचते. अर्थबोध होत नाही. डोकं बधिर झाल्यासारखं होतं. गुजर गल्लीतील घर कोसळून दोन ठार व एक जखमी. तीस फूट उंचीवर तिसऱ्या मजल्यावर झोपलेली मुलगी पलंगासकट खाली आली. तिला सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल केले असून प्रकृति सुधारत आहे. मला धक्काच बसतो. रंजना ही माझीच मुलगी असते. मी तिची जन्म-दाती आई असूनदेखील, तिच्या अशा असहाय्य क्षणी तिच्यापासून कितीतरी दूर असते. रविवार असल्याने तार मिळतच नाहीं. सोमवारच्या वर्तमानपत्रात ती बातमी वाचून हातपाय कापू लागतात. अंगातील शक्तिच जणू नाहीशी होते. मुलींना आधाराला कोणीच नाहीं ह्या कल्पनेने जीव कासावीस होतो. घर कसे पडले? रंजनाला कोठे लागले? घर पडलं तेव्हा इतरजण कोठे होते? एक ना दोन, असंख्य प्रश्न डोक्यात काहूर माजवतात. नगरला मन तर केव्हाच पोहोचलेले असते. रंजना माझ्या वाटेकडे डोळे लावून बसली आहे. तिने सारखा माझा ध्यास घेतला आहे. मनाचे अणुरेणू ह्या विचारानी व्यापून जातात. दवाखान्यात रंजना माझी चातकाच्या आतुरतेने वाट बघत होती. मुका मार बसल्याने ती उठूच शकत नव्हती. डोळे पाण्याने भरले होते. शब्द ओठापर्यंत आले होते. पण तिथूनच परतत होते. अबोल झाले होते.

रविवार असल्याने ती दुपारी पलंगावर झोपली होती. घर पडल्यानंतर कॉटसकट जेव्हा ती खाली कोसळली, तेव्हाच तिला जाग आली. घरावर अस-लेला पत्रा गॅलरीच्या कठड्याला अडकून लोंबकळत होता. त्याच्या पासून रंजना केवळ ६ फुटावर होती.

ती ज्या मातीच्या ढिगावर पडली होती. त्याखाली एक स्त्री व तिचे बालक चिरनिद्रा घेत होते. सुदैवाने रंजना वाचली होती. काळ दोन पावलावर येऊन ठेपला होता. बाबांचे मी मनोमन आभार मानले. त्यांनीच जणू तिला जीवदान दिले होते. एवढ्या मोठ्या अपघातातून ती वाचली होती. आजही आठवणींनी अंगावर शहारे येतात. काळ आलाच होता, पण वेळ आली नव्हती. हेच खरे.

• • •

# शिरडी-वृत्त-माहे एप्रिल सन १९७५

## – रामनवमी उत्सव कार्यक्रम

या महिन्यात रामनवमी उत्सव आल्यामुळे साईभक्तांची गर्दी बरीच होती. काही कलाकारांनी श्रींच्यापुढे हजेरी दिली, ती खालील प्रमाणे :-

किर्तन :- १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची किर्तने नेहमी-प्रमाणे झाली.

२) श्री. शंकर वासुदेव गदो ठाणे. ३) ह. भ. प. कमलाकर बुवा चोपडेकर जि. बीड. ४) ह. भ. प. तुकाराम बुवा आजेगांवकर परभणी.

प्रवचन :- ह. भ. प. निवृतिराव पाटील गोंदकर, शिरडी.

–: गायन, वादन, भजन वगैरे :–

१) श्री. बाळासाहेब माळवदकर पुणे. २) श्री. स्वामी संजयानंद स्वर्गाश्रम ऋषिकेश. ३) श्री. रामेश्वर प्रासादिक भजनीमंडळी, रत्नागिरी ४) श्री. लक्ष्मण ग. देवासकर मुंबई. ५) श्री. लक्ष्मण द. राऊत अ. नगर. ६) श्री. दगडूबावा औरंगाबाद ७) श्रीमती लक्ष्मीबाई ना. मिरीकर मिरी ८) श्री. गोविंद रा. मिरीकर, अ. नगर. ९) सौ. प्रेमलता वि. देशमुख, औरंगाबाद १०) श्री. अजित रा. गरुड धुळे ११) श्री. रामराव पु. हिंगणे. १२) सौ. कमलाबाई प्र. जिनसीवाने अ. नगर. १३) श्री. शामराव आ. साळुंके मालेगाव १४) श्रीराम वि. सातार्डेकर, मुंबई. १५) श्री. प्रभूदेव सरदार मुंबई. १६) श्री. अनंत राणे मुंबई. १७) श्री. शांताराम राऊत मुंबई. १८) श्री. सुजन साळकर मुंबई. १९) श्रीमती अलका जोगळेकर मुंबई २०) श्री. मुकुंद विजयकर, मुंबई २१) श्री. रघुनाथ बा. सांडभोर पुणे २२) सौ. मधुबाला चावला, मुंबई २३) सौ. शशिकला वैशंपायन निफाड. २४) श्री. गो. ह. वैशंपायन निफाड २५) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई २६) श्री. कु. अनिता प्रभु मुंबई २७) श्री. शामसुंदर भेडा संगमनेर. २८) डॉ. पाटकर मुंबई. २९) सौ. शकुंतला मो. जोशी नशिक. ३०) सौ. शरयु सा. मराठे शिर्डी ३१) सौ. सुनिता सु. खेडकर पुणे. ३२) श्री. ज्ञानोबा ता. वाडेकर शिर्डी ३३) श्री. शिवाजी तु. धुमाळ, शिर्डी. ३४) श्री. एम. गणपतराव नायडू नागपूर. ३५) श्री. हरकचंद च. रुणवाळ, आलेगांव ३६) श्री. नरेश माऊस्कर, पुणे. ३७) श्री. शेख टेलर गणेशनगर. ३८) श्री. अहमद पठाण नांदगाव ३९) श्री. किसन स. खरात सावळे विहीर. ४०) श्री. भिमराज बो. बनगोडे, जाखेवाडी ४१) श्री. दत्तात्रय द. केदारे, लक्ष्मीवाडी. ४२) श्री. ज्ञानेश्वर वि. कर्मासे साकोरी. ४३) श्री. पद्माकर प्र. पैठण, बोरसर ४४) श्री. शेखनबाब उमर पटेल, अस्तगाव. ४५) श्री. सय्यद जामदार राहाता. ४६) श्री. जगन्नाथ का. वनकर सावळे विहीर. ४७) श्री. चंद्रशेखर म. देशपांडे, पुणे. ४८) श्री. सुनिल बाबुराव कुलकर्णी पुणे. ४९) अरुण पु. रानडे, कोपरगाव ५०) श्री. शंकर रा. साळकर, कोपरगाव ५१) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिरडी. ५२) श्री. अशोक ग. औसक,

संगमनेर ५३) श्री. नाथराव नेरळकर. औरंगाबाद. ५४) श्री. पुजारी औरंगाबाद ५५) श्री. अग्निहोत्री औरंगाबाद. ५६) श्री. लक्ष्मीकांत बोरडे. औरंगाबाद. ५७) श्री.रघुनाथ नागरे शिर्डी. ५८) श्री. रामानंद स्वामी बेळगाव. ५९) श्री. पांडुरंग मुळे (कै. तुकाराम खेडकर लोकनाट्य.) पुणे. ६०) श्री. नानासाहेब रासने पुणे. ६१) श्री. ज्ञानेश्वर रा. मते कोपरगाव ६२) श्री. सुधाकर ना. कामतेकर मुंबई. ६३) श्री. साईनाथ भजनी महिला मंडळ शिर्डी. सौ. इंदिराबाई का. पाठक शिर्डी, सौ. शकुंतला रा. खोत, शिर्डी, सौ. सुशीला भानुदास गुजर, शिर्डी, सौ. उषा प्र. मुळे शिर्डी, सौ. वत्सलाबाई व. रासने, शिर्डी, श्रीमती लिलाबाई कां. गुजर, शिर्डी ६४) श्री. यशवंत म. उपाध्ये, मुंबई. ६५) श्री. शाम बा घाटे मुंबई. ६६) श्री. पु. ग. शेटये, मुंबई.

## शिरडी--वृत्त--माहे मे–१९७५

या महिन्यात शिरडीस श्रीसाईबाबांचे दर्शनाकरिता बाहेरगावची भक्त-मंडळी नेहमीप्रमाणे बहुसंख्येने आली होती. काहीं कलाकारांना श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :–

**कीर्तन** :– (१) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली. (२) श्री नानासाहेब रासने. पुणे. (३) ह. भ. प. कल्याण स्वामी संगमनेर. (४) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे. शिर्डी.

**प्रवचन** :– (१) श्री ह. भ. प. जगन्नाथ वि. वाघचौरे शिर्डी. (२) ह. भ. प. निवृत्ती पाटील गोंदकर शिर्डी.

**भजन, गायन, वादन वगैरे** :– (१) श्री. सत्यसाईबाबा समिती उल्हास-नगर ठाणे. (२) श्रीमती ज्योती ए. मनूजा. मुंबई. (३) श्री. ब्रम्हेश वा. लांजेकर साईनाथकृपा मठ पुणे. (४) श्री. रघुनाथ ना. केसकर, अ. नगर. (५) कु. वीणा र. केसकर, अ. नगर. (६) श्रीमती सीता रा. कोपोकर, मुंबई ७. (७) श्री सैयद बाबू, (८) कु. शीला पाध्ये, मुंबई. (९) श्री रामदास पाध्ये, मुंबई (१०) श्री आत्मानंद आचरेकर, मुंबई १२. (११) श्री बाबूराव वांदीवडेकर, दादर मुंबई. (१२) श्री. गणपतराव देवाज्ञकर मुंबई. (१३) श्री. बाळासाहेब माळवदकर, पुणे. (१४) सौ. मालतीबाई सुमंत बेराकपूर. (१५) सौ. विजयश्री र. पवळे, मालाड मुंबई. (१६) श्री नरेंद्र भा. कणेकर, दादर मुंबई

**माननीयांच्या भेटी** :–

(१) मा. श्री. शंकररावजी चव्हाण, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(२) मा. श्री यशवंतरावजी मोहीते, सहकारमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई.
(३) मा. श्री. खताळ राज्यमंत्री नियोजन, महसूल, महाराष्ट्र राज्य मुंबई.
(४) मा. व्ही. सुंदरम IAS जिल्हाधिकारी अहमदनगर.
(५) मा. दादासाहेब रुपवते, माजीमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई.
(६) मा. रामराव आदिक ॲडव्होकेट जनरल महाराष्ट्र मुंबई.

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

Regd. No. MH/BYE/26

# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १-५० | ८" × १०" | रु. ०-५० |
| १०" × १४" | रु. १-०० | २½" × ३½" | रु. ०-२० |
| ४½" × ५½" | रु. ०-१० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. डी. डी. नेरॉय यांच्या ब्लॉकावरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | २५.५६ × ५०.८ | १-५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ,, ,, | १-२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | ,, | २२.८६ × ३३.०२ | ०-५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ,, ,, | ०-५० |
| ५. शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा अल्बम ) | | | २-०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४

मुद्रक : **पांडुरंग मोरे,** बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.